साप्ताहिक
माणूस
शनिवार । १२ ऑक्टोबर १९७४ । एक रुपया

# दोन घास अन्नाच्या शोधात

मधुश्री

–उठावं
वाट धरावी
तर, कुठं जावं ?

नुस्तं–चालचालून थकतो
पायाला भेगा पडत्यात.
जन्मलं–वाढल्यालं
गाव सुटतं....
पडकं झडकं घरदार तुटतं....
दोन घास अन्नाच्या शोधात.

संगती बायकू पोरं
मी म्होरं
नुस्ती डोकीवर आभाळाची सावली
पन् आतबाहीर
उन्हाचीच काह्यली
कोणच्या दुश्मनानं
ही आमची अशी
वाट लावली...

आजपण काम न्हाई
जिवाला आराम घे.
पेटण्या–पेटवण्या आधी
स्वत:लाच नेट दे

उद्या–
उजाडेल–दिवस उगवेल–
तेव्हा उठ–
ही भरगच्च बाजारपेठ
ही दुकानं ह्या कचेऱ्या
ही रंडीबाज हॉटेलं

पेटव किंवा
खुशाल करून टाक लुटालूट
निदान मरताना तरी मिळू दे
अखेरची
ही एवढीच तुला सूट

सटासट् गोळ्या सुटतील.
दोनचार मुडदे पडतील.
नुकसानीचा हिशोब–अंदाज
भरपाई
जाहीर करतील.
रस्त्यारस्त्यात खडा पहारा
अन् सायरन्, शिट्ट्या
पोलिसी राज्ययंत्रणेचा पुकारा.
शांतता !

अन् मग
दोन घास अन्न (मिळो न मिळो)
समाधानात
तुझा प्राण जाईल.

◻ ◻


तुम्ही राजिनामा द्यायलाच नको होता. आता आमचेच पहा. लोक आग्रह धरतात तरी आम्ही राजिनामा देतच नाही!


निदान दोन ऑक्टोबरला तरी तुम्ही दुकान बंद ठेवायला हवे होते!
दारू
देशी विदेशी दारूचे दुकान


स्मगलिंग अन्
लिंगवाद यांचा घोळ
करू नका ! सोडा त्यांना !!


भरपूर ज्ञान
सांठवा एवढेच
माझे सांगणे
आहे.
सर,
नाही जमणार !
त्यामूळे साठेबाजी
होईल !!
श्यामजोशी

# साप्ताहिक माणूस

| | | | |
|---|---|---|---|
| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | १२ ऑक्टोबर | अंक : विसावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७४ | किंमत : एक रुपया |


स. न. वि. वि.

'ही हाडे किती दिवस पुरणार?' हा लेख (माणूस १४ सप्टेंबर अंक) वाचला. बी. ए. मनुष्य १ रु. रोजावर काम करतो व हे काम महिनाभर तरी मिळेल की नाही याची शाश्वती नसते. अशा स्थितीत माणसाच्या पुढे तीन मार्ग आहेत.

१ : गांवांतील सधन शेतकरी, व्यापारी, सरकार यांची गोडाउन्स लुटणे,

२ : परप्रांती जाऊन काम शोधणे,

३ : आहे त्या स्थितीत खितपत रहाणे.

आज बी. ए. ला बसलेला तरुण नं. ३ चा मार्ग अवलंबित आहे. नं. १ कधीच जमणार नाही. खानदेशमध्ये तसा दुष्काळ कधी पडलेला नाही. इथे काम कमी करून सर्वसाधारण माणसाला दोनदा खायला मिळू शकते, त्यामुळे येथील worker आळशी आहे.

माझी Poultry, Dairy, लिंबाची झाडे आहेत. समजा हा १ रु. रोज मिळवणारा कॉलेज विद्यार्थी येथे आला व सांगितलेले सर्व काम अंग मोडून, हंसतमुख चेहऱ्याने केले तर दरमहा मी त्याला १२५ रु. व शेतीवर रहायला जागा देऊ शकेन. त्याला स्वयंपाक करून जेवावे लागेल. पडेल ते काम करावे लागेल. थोडेसे शिक्षण असलेला ४० ते ५० चे दरम्यानचा मनुष्य असला तरी तो हे काम करू शकेल. खुरपणी करून १ रु. रोज मिळविण्यापेक्षा, स्मशान खणून हाडे काढून किंवा जनावरे खात नसलेल्या गवताचा बरगडा खाण्यापेक्षा दरमहा १२५ रुपये मिळवणे खास वाईट नाही.

त्याची इच्छा असल्यास असे काम कायमचेही मिळू शकेल व या कामातून तो नवीन काम निर्माण करू शकेल. त्याच्या जिद्दीवर अवलंबून आहे.

मराठी माणसात अनेक दोष आहेत. जरुरी असते तेव्हा तो लाचार असतो. काम झाले की तो मगरूर होतो. काम करताना घड्याळाकडे लक्ष असते. अंग मोडून काम करणे, वरिष्ठांना संतुष्ट ठेवणे त्याच्या पिंडाला मानवत नाही. या गुणाला तो मस्का लावणे म्हणतो.

मी मध्यें देवरुखला गेलो होतो. एका कॉन्ट्रॅक्टरच्या घरी बसलो होतो. समोर Saw-mill होती. मराठी माणसाची Saw-mill बघून आनंद वाटला. पण त्यांना विचारल्यावर कळले की, मालक, नोकर सर्व कच्छी आहेत. रात्री १ वाजता जरी Truck लाकूड घेऊन आला तरी मालक, नोकर सर्व हिरीरीने काम करून लवकरात लवकर (ट्रक) मोकळा करतात. दुसरी एक मराठी माणसाची Saw-mill आहे. चालत नाही. जुनी असून चालत नाही. कारण बेफिकिरी, अनियमितपणा वगैरे. कुडाळला गेलो होतो. मंगलोरी कौलाचा कारखाना आहे. काम भरपूर. पण Local मनुष्य overtime करायला नाखूश असतो. मॅनेजरनी सांगितले की खानापूरची (कर्नाटक) ३० कुटुंबे त्यांनी कुडाळला आणून वसवली व overtime चा प्रश्न सोडवला.

असा आहे मराठी माणूस.

आजचा प्रश्न समुद्राएवढा प्रचंड आहे. मी सुचविलेला उपाय म्हणजे एक थेंब आहे. डोक्यात विचार आले, आपण या लोकांशी संपर्क साधू शकता म्हणून आपल्याला लिहिले. असो.

२०-९-७४

—डॉ. बाकरे, जळगाव

# मानवाचे भवितव्य

## टॉयन्बी यांच्या मते आधुनिक मानवाने प्रेम, सामंजस्य आणि नवनिर्माण हेच प्रधान जीवनहेतू मानणे इष्ट होईल

'सरव्हायव्हिंग द फ्यूचर' या ग्रंथाची थोडक्यात ओळख

ल. ब. हरोलीकर

जपानी प्राध्यापक केई वाकाइझुमी यानी इतिहासमहर्षी डॉ. आरनल्ड टॉयन्बी याना विचारलेल्या, मानवजातीच्या प्रस्तुतच्या समस्यावावतच्या, एकूण ६७ प्रश्नांकी काहीना त्यांनी दिलेली उत्तरे 'सरव्हायव्हिंग द फ्यूचर' या ग्रथामध्ये दिलेली आहेत. प्लेटोच्या विख्यात सवादमालिकेत शोभतील अशी अनेक विचार-मौक्तिके या सवादरूप ग्रथात विखुरलेली आहेत आधुनिक मानवी जीवन एखाद्या दोरावरून वाटचाल करण्यासारखे अस्थिर, दोलायमान झाले आहे. आशा-निराशा, भले-बुरे, युद्ध-शातता, बुद्धि-भावना, आदर्श-वास्तव यामधील विग्रहामुळे आजचा मानव चिंताग्रस्त, अस्वस्थ, कातर झाला आहे. येत्या काही वर्षांत मानवापुढे काय वाढून ठेवले आहे, त्याचे भवितव्य काय आहे, मानवी मूल्याचे जतन व सवर्धन करणे यापुढे मानवला शक्य होईल काय ? या चिंतेने तो विकल झालेला आहे विवेक व सुविचार याची सर्वत्र पिछेहाट होताना दिसत आहे मानवी जीवनाला स्थैर्य व प्रतिष्ठा देणाऱ्या कुटुबासारख्या सामाजिक सस्थाची पडझड झालेली आहे. सामाजिक परिवर्तनाच्या प्रचड वेगामुळे मानवजातीचा तोल सुटत आहे. तत्रविज्ञानामुळे मानवजातीचा स्वाभाविक निसर्गपरिसर नाहीसा होत आहे आणि त्याऐवजी त्यानेच निर्मिलेल्या कृत्रिम अस्वाभाविक परिस्थितीच्या पिंजऱ्यामध्येच तो अडकून पडलेला दिसतो. मानवी जीवनाची वाटचाल दिशाहीन झालेली दिसत आहे....विचारी मानव आज भांबावून गेला आहे. आणि काय करावे व काय करू नये याचा विवेक करणे त्याला कठीण झाले आहे.

अशा या प्रस्तुत जागतिक परिस्थितीचे डॉ. आरनल्ड टॉयन्बी या वयोवृद्ध इतिहासमहर्षीने समीक्षण करून प्रा. वाकाइझुमी याच्या काही प्रश्नांना उत्तरे दिली आहेत. मानवी जीवनाची बहुतेक सर्व क्षेत्रे त्या उत्तरात काही प्रमाणात समाविष्ट आहेत.

सवाद पहिला : यात आधुनिक मानवाच्या जीवनहेतूचा विचार माडला आहे. औद्योगिक क्राती व तत्रविज्ञान यामुळे जुन्या मध्ययुगीन शेतीप्रधान ग्रामीण समाजाचे रूपातर आता विशाल, शहरी, औद्योगिक समाजात होत आहे. समाजाचा आकार व परिवर्तनाची गती झपाट्याने वाढत आहेत. या नव्या सदर्भात मानवी जीवनाचे प्रधान हेतू काय असावेत हे पुन्हा एकदा स्पष्ट होणे अवश्य आहे. आजच्या मानवाचे ध्येय काय असावे ? त्याने कोणती जीवनमूल्य मानावीत ?

टॉयन्बी याच्या मते आधुनिक मानवाने प्रेम, सामजस्य आणि नवनिर्माण हेच प्रधान जीवनहेतू मानणे इष्ट होईल. त्याचसाठी त्याने आपली बुद्धी व शक्ती वापरावी. त्यातच त्याच्या जीवनाचे साफल्य होईल. इतरासाठी त्याग करावयास जे प्रवृत्त करू शकते तेच खरे प्रेम होय. स्वार्थविन्मुख बनविते तेच खरे प्रेम. गौतम बुद्ध, येशू ख्रिस्त हे अशा स्वार्थनिरपेक्ष प्रेमाचे उत्कृष्ट आदर्श होत. 'वसुधैव कुटुम्बकम् ।' अशा या प्रेमाची विशाल व्याप्ती असते. पशुपक्षी, किडेमुग्या यावरही प्रेम करा अशी जैनाची शिकवण आहे. इतराची सुखस्वप्ने समजावून घेणे व त्याना सहानुभूतीने साहाय्य करणे ही वृत्ती जोपासिली पाहिजे. आणि नवनिर्माणही आजच्या जीवनसदर्भात 'बहुजनहिताय बहुजनसुखाय' असायला हवे. निसर्गाच्या त्रुटी व उणीवा मानवाने आपल्या निर्णायक शक्तीने भरून मानवी जीवन सुखी व समाधानी बनविण्यासाठी सतत प्रयत्नशील असायला हवे. प्राचीन काळापासून मानव आपल्या बुद्धिकौशल्याने आपल्या निसर्गपरिसरामध्ये अनुकूल बदल घडवून आणीत आहे. ही प्रक्रिया आजही जोमाने चालली आहे. तथापि काही परिस्थितीमध्ये नवनिर्माणही दिशाहीन वा मानवहितविरोधी ठरू शकते. यासाठी निर्माणशक्तीला विवेकाची जोड मिळाली पाहिजे.

सवाद दुसरा : मानवी जीवनहेतूच्या सिद्धीच्या मार्गातील काही अडचणीचा विचार येथे केला आहे. ध्येयसृष्टी आणि आजची वास्तव परिस्थिती यामध्ये आज फार मोठी तफावत दिसते; त्यामुळे ध्येयमार्गाची वाटचाल होणेच दुर्घट झाल्यासारखे दिसत आहे. तरुण पिढीच्या नजरेस ही दुश्चिन्हे आलेली आहेत; आणि आपल्या भवितव्याबाबत त्यांना निराशा वाटू लागली आहेसे दिसते. जुन्या पिढीच्या हाती आजची राजकीय सत्ता आहे; परंतु बिघडलेल्या परिस्थितीला इष्ट वळण लावण्याचे शहाणपण किंवा सामर्थ्य त्याच्यामध्ये नाही. जुनी पिढी स्वार्थी, भोंदू व भित्री आहे. परिस्थितीचे आव्हान स्वीकारण्याची धमक तीमध्ये नाही किंवा ती परिस्थिती आकलन करण्याची पात्रता तिच्यात नाही. ह्याचे परिणाम मात्र आजच्या तरुण पिढीलाच अपरिहार्यपणे भोगावे लागणार आहेत. दोन पिढ्यातील सघर्ष यामुळेच उत्पन्न झालेला दिसतो. काही चिडलेले तरुण बडखोर बनले आहेत त्यांनी विद्यापीठांचा कारभार हिंसाचारांनी विस्कळित केला आहे. इतर काही तरुण 'हिप्पी' बनत आहेत. त्यांनी समाजाकडे, पारपरिक नीतिमूल्याकडे पूर्ण पाठ फिरवली आहे.

टॉयन्बीच्या मते नव्या-जुन्या पिढ्यातील सघर्ष हा नवा नाही. नित्याचाच आहे. आताच्या परिस्थितीमुळे तो अधिक तीव्र व

निकडीचा झाला आहे एवढेच. *या तीव्रतेचे कारण मानवाने निसर्गावर मिळविलेला विजय त्याने अद्यापि पचनी पाडलेला नाही हे होय. निसर्गावर विजय मिळवून मानवाचे सामर्थ्य खूप वाढले;* पण त्याला विवेकाची जोड मिळाली नाही. त्यामुळे त्या सामर्थ्याचा विधायक उपयोग होण्याऐवजी विघातक दुरुपयोगच होत आहे. यासाठीच राज्यसत्ता फक्त तत्त्वज्ञांच्याच हाती असावी असा आग्रह पूर्वी प्लेटोने धरला होता पण मार्कस्, ऑरेलियस, जनक यासारखे तत्त्वज्ञ राजे थोडेच. सर्वानाच सत्ता पचनी पाडता येत नाही. म्हणून काहीजण 'सत्तासन्यासा'चा मार्ग पसत करतात, उदा. बुद्ध किंवा सेंट फ्रान्सिस. सत्ता माणसाला भ्रष्ट करू शकते. मूर्खाच्या हाती सत्ता पडली तर समाज अधिकाधिक नीतिभ्रष्ट होत जातो.

हिप्पीची आत्यंतिक समाजविन्मुखता हेटाळणी करण्यासारखी नाही. त्या त्या काळी 'हिप्पी'–सदृश्य मानल्या गेलेल्या अनेकानी इतिहास घडविला आहे. हिप्पी चळवळीचे स्वरूप अद्यापि स्पष्ट व्हावयाचे आहे. तोपर्यंत त्याच्याबद्दल काही निर्णायक बोलणे कठीण आहे.

सवाद सातमध्ये टॉयन्बी तरुणांना उद्देशून म्हणतात की, त्यांनी परंपरावादी वडीलपिढीला विरोध करावा, पण तो महात्मा गाधीच्या वृत्तीने, कोणतीही हिंसाभावना मनात न ठेवता. मागील पिढ्याचे सचित कार्य पुढील पिढ्यांना भोगावे लागते; वडीलपिढीसुद्धा त्याच्या पूर्वीच्या पिढ्याच्या कर्माचे परिणाम भोगीत असते हे त्यानी विसरू नये.

सवाद तीन व सहा यांमध्ये आधुनिक औद्योगिक व तंत्रवैज्ञानिक क्रातीच्या परिणामाबद्दल विचार व्यक्त केले आहेत. तंत्रकौशल्याने मानवाने अलोट संपत्ती निर्मिलेली आहे. पण याचे विपरीत परिणाम आता दिसू लागले आहेत. निसर्गसंपत्तीचा बारेमाप उपसा मानवाने अनेक वर्षे करून निसर्गाला जवळ जवळ कंगाल बनविलेले आहे. शिवाय निसर्गसपत्तीची उधळपट्टीही केली जात आहे. जगले नाहीशी होत आहेत त्या ठिकाणी शहरे वसविली जात आहेत. त्यात प्रचंड कारखाने उभे रहात आहेत. त्यामुळे मनुष्यवस्तीची अमाप गर्दी, वाहतुकीची अनत साधने, कर्कश आवाज, भट्टयातून निघणारे विषारी धूर इ. मुळे हवा व पाणी दूषित होत आहे. अणुस्फोटाच्या उत्सर्गांमुळे वातावरण व समुद्रही दूषित होत आहे तंत्रविज्ञान हे वरदान की शाप?

टॉयन्बी म्हणतात की, आता इतिहासाची चक्रे उलट फिरणे कठीण आहे. भूपृष्ठाखालची संपत्ती कमी पडत चालली तर सागर-संपत्तीची पद्धतशीर मशागत केली पाहिजे. सागर-कृषिशास्त्र वाढविले पाहिजे. पण सागरी जल दूषित होणे ही खरी धोक्याची बाब आहे. जंगलाचा नाश करून आपण आपला सुदर निसर्गपरिसर गमाविला व त्याऐवजी शहरे, इमारती, कर्कश आवाज, धूर यांचा कृत्रिम परिसर निर्माण केला. आता शहरी जीवनाच्या पिंजऱ्यात मानव अडकला आहे. त्यातून सुटका होणे अशक्य दिसते.

१७ व्या शतकातील औद्योगिक क्राती ही काही इतिहासातली पहिली औद्योगिक क्राती नव्हे. ३०,००० वर्षांपूर्वी मानवाने हत्यारे तासून तयार केली. १०,००० वर्षांपूर्वी त्याने शेती, पशुपालन इ. तंत्रे आत्मसात केली. वायुशक्तीचा उपयोग ५००० वर्षापूर्वी व जलशक्तीचा २००० वर्षापूर्वी केला. या सर्व औद्योगिक क्रांत्याच होत. १७ व्या शतकानतर तिचा वेग व व्याप्ती खूप वाढली एवढेच; आणि तिचे परिणामही आता स्पष्ट जाणवू लागले आहेत. पूर्वी सर्वत्र 'जगलचा कायदा' होता. पण आता मानवी परस्परसबधाचा विचार केला तर सत्तास्पर्धा, हिंसाचार, विग्रह, वैफल्य व निराशा हे त्याहीपेक्षा अधिक रौद्रभीषण असल्याचे दिसून येत नाही काय; या आधुनिक 'सुधारलेल्या जीवनाचा उबग आला की आपण करमणुकीसाठी, साहसी जीवनाचा आनद घेण्यासाठी, शिकारीसाठी आफ्रिकेच्या जगलात जातो. शहरी जीवनात आपण फार तर विषारी औषधाचे फवारे मारून बागेतील झाडावरील कीडच मारू शकतो. त्यात 'शिकारी'चा आनद नाही.

आणि सर्वात दुःखाची गोष्ट ही की, निसर्गसपत्तीची एवढी लूट होऊनही सामान्य माणूस अद्याप पूर्वीसारखाच दरिद्री आहे अश्मयुगीन जीवनमानापेक्षा आजही त्याचे जीवनमान फारसे उंच नाही. शहरी कामगार ठराविक यत्रापाशी ठराविक कामच दीर्घकाल करीत रहातो. तो स्वत च यत्र बनतो. त्याच्या कामात नव-निर्मितीचे सुख त्याला लाभत नाही. मध्ययुगीन कामगाराचे 'काम' हीच त्याची 'करमणूक'ही होती. आता मात्र काम व करमणूक याची फारकत झाल्याने recreation साठी वेगळी तरतूद करावी लागते.

औद्योगिक क्रातीनंतर लोकसख्येची अमाप वाढ झाली. तत्रविज्ञानाच्या प्रगतीबरोबर ती नेहमीच झालेली आहे पण आता ती फारच झाली आहे पण त्यात अनुरूप असा बदल आपल्या शहररचनेमध्ये होत नाही. उदा. टोकियो. अगदी अलीकडे मात्र 'ब्राझीलिया'सारख्या शहराची रचना नव्या पद्धतीने होऊ लागलेली आहे हे सुचिन्ह होय.

तंत्र वैज्ञानिक प्रगतीचा राजकीय परिणाम महत्त्वाचा आहे. *आता तज्ज्ञाचे महत्त्व वाढतच जाणार. सामान्यजनांना समाजाच्या कारभारामध्ये 'सहभागित्व' देणे अशक्य होत जाईल. राज्यकारभार अधिकाधिक केन्द्रीभूत होत जाईल.* कारण जलद सामाजिक परिवर्तनामध्ये लोकशाही जमान्यातील सथपणा, ढिलाई व प्रमादशीलता कोणीही खपवून घेणार नाही. विशालसमाजाच्या किमान शासनासाठी कारभारविषयक निर्णय व त्यांची अमलबजावणी त्वरित होणेच अवश्य ठरेल; नाहीतर अराजक माजू शकेल. अराजकापेक्षा कायद्याचेच राज्य–अगदी हुकूमशाही कायद्याचेच राज्यसुद्धा लोक अधिक पसत करतील. अशा राज्यात व्यक्तीची प्रतिष्ठा सध्यासारखी मानली जाणार नाही. समाजासाठी व्यक्ती हीच व्यक्तीची भूमिका होय जसे मानले जाईल. समाज हा सतत विशालतर होत जाणारा आहे. व्यक्ती त्या मानाने स्थिर, आहे तशीच राहते. आताच ही प्रवृत्ती दिसू लागली आहे. समाजाचा कारभार अधिकाधिक व्यक्तिनिरपेक्ष होत चालला आहे

*समाजाच्या प्रभुत्वाला व्यक्तीकडून आव्हान मिळणे हे पूर्णपणे अशक्य व्हावे यासाठी सर्व आधुनिक तत्र-कौशल्याचा उपयोग केला जाणे अशक्य नाही. व्यक्तीचे अभिसधान (conditioning) केले जाईल. त्यासाठी जन्युशास्त्रीय तत्रे (genetic techniques) वापरली जाणेही अशक्य नाही.* एकूण समाज आणि व्यक्ती याच्यामध्ये सघर्ष टाळण्यासाठी पूर्वी 'धर्म' हे अभिसधान–माध्यम म्हणून वापरले जाई, आता धर्माची जागा तत्रविज्ञान घेईल. एकूण व्यक्ति-

स्वातंत्र्याचा बडिवार कमी होईल. व्यक्तिगत सबधाचे महत्त्व कमी होईल. आताच व्यक्तिव्यक्तीमधील सबध काहीसे उथळ व उदासीन होत चाललेले आपण पाहतोच आहोत.

एकाच जागतिक राज्यात याची परिणती होईल. आणि सर्व जगाचा कारभार त्या जागतिक राज्याच्या सनदी नोकरामार्फत पाहिला जाईल. या जागतिक राज्याचा नेता लेनिनसारखा चतुर, बुद्धिमान, बेडर, समर्थ, निर्घृण व निःस्पृह हवा. जागतिक समाजाची या प्रकारची व्यवस्था होणे अवश्य ठरेलसे वाटते. कारण अशा व्यवस्थेला पर्याय फक्त 'अराजकता' हाच होय. प्रस्तुत परिस्थितीमध्ये मानवजातीने स्वत:चा सर्वनाश टाळणे एवढेच मर्यादित उद्दिष्ट ठेवले पाहिजे.

पण यामधून सर्व मानवजातीची खरी एकात्मता साधणे शक्य होईल काय? भाषिक विविधता, वांशिक पूर्वग्रह आणि सांस्कृतिक भेद हेच या कामी अडथळे आहेत. धार्मिक भेदाचे महत्त्व आताच कमी होऊ लागले आहे. ब्राझिल, हवाई बेटे या ठिकाणी अनेक वंशाचे लोक एकत्र रहात आहेत. त्यांचे विवाहसंबधही होत आहेत. सांस्कृतिक वैविध्य रहाणारच. परतु शिक्षणाच्या माध्यमाने सांस्कृतिक गैरसमज दूर करता येणे शक्य आहे. तरीही काही लोकांच्या मनातील वांशिक पूर्वग्रह जाणे फार कठीण आहेसे वाटते.

तंत्रवैज्ञानिक प्रगतीच्या झपाट्यात कुटुंबस्था सापडली आहे व ती नामशेष होण्याची भीती उत्पन्न झाली आहे. कृ. . गर्भधारणा, लैंगिक नीतिमत्तेसंबधीच्या बदलत्या कल्पना, गर्भपातविषयक नवे विचार, जन्युशास्त्रीय नवे शोध यामधून पारपरिक सामाजिक कुटुंबसंस्था पूर्वीच्या स्वरुपात टिकणे कठीण दिसते. परतु बालकांच्या निकोप विकासाच्या दृष्टीने कोणत्या ना कोणत्या स्वरुपात कुटुंबसंस्था टिकणे आवश्यकच वाटते.

सवाद पाचवा: टॉयन्बी यानी आधुनिक शिक्षणपद्धतीबाबत विचार व्यक्त केले आहेत. सध्याची शिक्षणपद्धती प्राचीन ग्रीकांच्या विचारांवर आधारलेली आहे. पण त्या जुन्या ऐतिहासिक सदर्भात उपयुक्त ठरलेली पद्धती आजच्या परिवर्तनशील समाजात कितपत उपयुक्त ठरू शकेल? पूर्वीच्या पिढ्यांच्या अनुभवातून आपल्याला धडा घेणे आजही शक्य आहे. परतु आजच्या विशिष्ट ऐतिहासिक सदर्भात ती उपयुक्त ठरली पाहिजे. आज विद्यार्थिवर्गाची एवढी अफाट सख्या आहे की, सर्वांना एकाच सामान्य पद्धतीचे शिक्षण देणे कितपत इष्ट होईल हा प्रश्न आहे. या दृष्टीने विद्याशाखांमध्ये विपुलता येणे अवश्य ठरेल.

• अभ्यासक्रमाचे विशेषीकरण (Specialization) हा आज काहीसा चिंतेचाच विषय झाला आहे. सपूर्ण ज्ञानसग्रह कोणालाही पचनी पडणे शक्य नाही. यासाठी मर्यादित ज्ञानक्षेत्राचा सूक्ष्म अभ्यास करणे योग्य ठरेल, परतु तेवढ्याने त्या विशेषज्ञाचे 'शिक्षण' पूर्ण झाले असे मानणे चुकीचे ठरेल. समाजात अनेक प्रकारचे 'विशेषज्ञ' असले तरी सर्व समाजाच्या कारभारात सर्वांना सहकार्याने सहभागी होणे अवश्य असतेच. यासाठी समाजाच्या सर्व घटकांना समान असे काहीतरी 'सामान्य शिक्षण' (General Education) दिले जाणे अवश्य आहे. तसे झाले नाही तर अशा विशेषज्ञांचा दृष्टिकोण एकांगी व त्याचे निर्णय प्रमादशील ठरण्याचा धोका आहे.

समाजहिताच्या दृष्टीने शिक्षणाचा विचार केला तर शिक्षणात आता मानवतावादावर भर दिला पाहिजे. समाजाची तंत्रवैज्ञानिक प्रगती भरपूर झालेली दिसते. परंतु तरीही समाजातील व्यक्ती व व्यक्तिसमूहामधील स्पर्धा, मत्सर, सामाजिक संबंध हे अनिष्ट होत चालले आहेत. आता शिक्षणाचे उद्दिष्ट आपल्या 'भौतिक परिसराचे परिवर्तन' हे न ठेवता आपल्या 'मानवी सामाजिक सबंधांचे परिवर्तन' करणे हा ठेवला पाहिजे.

अलौकिक व्यक्तिमत्त्वाच्या मुलाचे शिक्षण विशेष प्रकारचे असणे इष्ट होईल. हीच मुले मानवजातीचे भावी नेतृत्त्व करणार आहेत. त्यांच्यासाठी लहान आकाराच्या विद्यापीठीय संस्था निघणे अवश्य आहे. त्यामध्ये प्रवेश केवळ व्यक्तिगुणांच्या आधारेच दिला जावा. केवळ कुशाग्रबुद्धिमत्ता हाच एक निकर्ष असू नये. अशा संस्थांमधील प्राध्यापक वर्ग अव्वल दर्जाचा असावा. त्यानी व्यक्तिगत लक्ष पुरवावे. विद्यार्थ्यांनीही शिक्षण पूर्ण झाल्यानतर काही काळ समाजकार्यास वाहून घेतले पाहिजे.

कामगारवर्गाला आता सुधारलेल्या यत्रामुळे अधिक फुरसत उपलब्ध होईल. हा फुरसतीचा काळ विधायक रीतीने व्यतीत करण्याबाबतचे मार्गदर्शन त्याना शिक्षण सस्थामधून मिळणे अवश्य आहे.

आतरराष्ट्रीय सामंजस्य निर्माण करण्याचे कार्य शिक्षणसस्थाच उत्तम रीतीने करू शकतील. त्यासाठी 'यूनो'च्या नियत्रणाखालील विद्यापीठीय दर्जाच्या शिक्षणसस्था सर्वत्र असाव्यात. याची मुख्य कचेरी नेदर्लंड्स किंवा फिलिपाईन्स यासारख्या ठिकाणी असावी.

सवाद चौथा. धर्मभावना ही एक मानवी जीवनाची नित्याची गरज आहे. आधुनिक 'राष्ट्रधर्म' त्या भावनेची जागा घेऊ शकणार नाही. तत्रविज्ञानाने मानवाचे भौतिक सामर्थ्य वाढले पण त्याचे नैतिक सामर्थ्य घटत आहे. ही नैतिक फट (Morality gap) रुदावत आहे. भौतिक विश्वावरच आपले लक्ष केंद्रित झालेले आहे. ते आता मानवी मनाच्या आतरिक विश्वाकडे वळविले पाहिजे. शिक्षणाने मानवाचे पुनर्मानवीकरण (re-humanization) साधले पाहिजे.

या ग्रथामध्ये 'कर्म-कल्पनेचा' उल्लेख वारवार झालेला आहे. ऐतिहासिक घटनांचे परिणाम अपरिहार्यपणे भोगावे लागतात, या विचाराचे विवरण करताना डॉ. टॉयन्बी यानी आपली आध्यात्मिक-नैतिक-धार्मिक बैठक कायमच ठेवलेली आहे. सामाजिक न्याय आणि नैतिक मूल्ये यावर त्यानी वारवार भर दिला आहे. वयाच्या ८२ व्या वर्षी त्यांच्या विचारात पारंपरिकतेचा वास कोणाला आल्यास तेही समजण्यासारखे आहे. तथापी या श्रेष्ठ इतिहासमहर्षीने मानवी इतिहासाचे प्रदीर्घ समालोचन करून मानवजातीच्या भवितव्याबद्दल काढलेले निष्कर्ष विचारप्रवर्तक आणि केलेले मार्गदर्शन उद्बोधक आहे यात यत्किंचितही शका नाही. तरुणाच्या असहिष्णुतेबद्दल सहानुभूती, तसेच दलितवर्गाच्या असहायतेबद्दलची कणव त्यांच्या या ग्रथात पदोपदी आढळून येते. विशेषत: जुन्या पिढीला जरूर विरोध करा, परंतु तो करीत असताना हिंसात्मक विचाराना मनामध्ये यत्किंचितही थारा देऊ नका; महात्मा गांधीचा आदर्श पुढे ठेवा, हा तरुण पिढीला त्यानी दिलेला सदेश भारतीय मनाला तरी मानवेल असे समजावे का? □

[ समाज प्रबोधन पत्रिका, जुलै-ऑगस्ट १९७२ अकावरून पुनर्मुद्रित ]

## कृष्णाकाठच्या या माणसाचं आवडीचं क्षेत्र म्हणजे पाण्याच्या योजना !

# कोळेनरसिंहपूरचे नानासाहेब सावंत

प्रा. बापूराव जगताप

'अरे तबाखू आण इकडे' असा हुकमी आवाज ऐकला, की आमच्या भागातला माणूस कितीही गडबडीत असला तरी झटकन् थांबतो. अदबीने जवळ येतो. आनंदाने बटवा खोलतो. समाधानानं तबाखूची चिमूट काढतो आणि कृतज्ञतेने हातावर अलगद ठेवतो. त्याला माहिती असते या सरळसाध्या माणसाला एवढेच लागते. एवढ्यावरच त्याचे भागते. यापेक्षा अधिक ह्या माणसाला काही लागत नाही. नाहीतर या माणसाला काय कमी ? ६०–७० एकर बागाईत शेती. चार भावाचे एकत्र कुटुंब त्या चार भावाचा वाढलेला वेलविस्तार. सरदारी थाटाचा वाडा. परंपरागत घराण्यात चालत आलेली प्रतिष्ठा. परिसरात नैतिक दबदबा. कितीएक माणसे त्याच्या कोणत्या ना कोणत्या मरणाने न्हाऊन निघालेली. असा हा घरदाज माणूस. पण कधी अहंकार नाही. कधी खोट्या प्रतिष्ठेचा बुरखा पांघरला नाही. कधी कुणाला दाबले नाही, की कुणाला वाकवले नाही. ह्या माणसाला मच्छेंद्रनाथाच्या डोंगराने उदात्त आणि खंबीर मन दिलेय. ह्या माणसाला कृष्णाकाठाने नैतिकतेच्या सीमा सांगितल्यात. ह्या माणसाला कृष्णेच्या पात्राने पावित्र्य दिलेय आणि कृष्णेच्या वाहत्या पाण्याने समाजासाठी समर्पण व्हायचा वरही दिलाय. असा हा माणूस तेजस्वी आणि मनस्वी. ह्या माणसाला हा कऱ्हाड-सांगलीचा कृष्णाकाठचा परिसर प्रेमाने 'आण्णा' म्हणून हुकारतो. या माणसाला ही भूमी 'नानासाहेब' म्हणून मान देते. या माणसाला हा प्रदेश 'साहेब' म्हणतानाही नम्रपणे झुकतो. तर या माणसाला त्याच्याच तोलामोलाचा एखादा मजेने 'साहेबबहाद्दर' म्हणतो ह्या सर्व किताबाची ह्या माणसाने कधी पूजा केली नाही. वय साठीत आलय पण ह्या पदव्याकडे ह्या माणसाने कधी आपुलकीने पाहिले नाही. स्वतःचा एवढा मोठा रहाता वाडा कधी प्रेमाने डोळ्याखालून घातला नाही. लहान तीन भावाना संसाराबद्दल कधी काही विचारले नाही. पोराचे काय चाललेय म्हणून डोकावणे नाही, की बायको आणि लेकी-सुनाच्या वाटेलाही नाही. ह्या माणसाने संसार केला तो समाजाचा. ह्या माणसाने गोष्टी केल्या त्या या परिसराशी. हा माणूस मध्ये डोकावला, तो या भूमीच्या विकास प्रकल्पाशी. हा माणूस झिजला, तो या कृष्णा खोऱ्यातील मातीशी. हा माणूस सुखाने डुबला, त्या या कृष्णेच्या सखगंभीर पाण्याशी.

माणूस कमालीचा भटका. पायात सतत चक्र. केवळ स्वतःच्याच शेतात हा माणूस फिरकत नाही. तर हातावर पाणी पडले की डोक्यावर टोपी चढवून (एक सांगतोच ह्या माणसाने साठ वर्षांच्या आयुष्यात गांधी टोपी कधी घातली नाही. पण गांधीच्या जीवनाचे सर्व आदर्श ह्या माणसाने अंगिकारले. एक टोपीच सोडली तर ते खरे गांधीवादी आहेत. असे मीच नव्हे तर हा कृष्णा परिसर त्यांच्याबद्दल छातीठोकपणे सांगू शकतो. इतर सारे या भागात प्रचंड गांधी-टोपीवालेच !) तर सांगायचे म्हणजे टोपी चढवून हा माणूस बाहेर पडतो. संध्याकाळी खूप वेळाने हा माणूस घरी परततो. त्यावेळी पोहचवायला कुणाची फटफटी येते. तर कुणाची स्कुटर येते किंवा कृष्णा सहकारी साखर कारखान्याची जीप तरी येते. या दिवसभरात हा माणूस करतो काय ? तर हा माणूस एका दिवसात चार-पाच गावाची शिवारे सहज ओलांडतो. मग ते वहे असो, शिरटे असो, किल्लेमच्छिंद्रगड असो, येडेमच्छिंद्र असो वा खुबी असो. कोळे-नरसिंहपूर तर या माणसाच गावच. तर हा माणूस नुसता शिवारा-तून भटकत नाही. तीक्ष्ण नजरेचा वेध घेत सतत प्रकाशझोतासारखा शिवारातून फिरतो. कुठे माणसे दिसली की स्थिरावतो. 'ह हणमत-राव द्या तबाखू' तबाखूची गोळी करून एकदा तोंडात घातली की माणसानं बैठक मारलीच. मग हणमतरावांना आपण होऊन सांगणार, जमिनीत कोठून कसे पाणी घ्यावे. जमिनीचा निचरा कसा होईल. कुठे आणि किती खोल नाला खोदावा. कोणते पीक घ्यावे. त्याला कोणती रासायनिक खते वापरावीत. ही खते कुठून आणावीत. कशी आणावीत. कधी आणि किती द्यावीत ? कशी ठेवावीत. इत्यादी इत्यादी. उठत उठता रासायनिक खतांबरोबरच शेणखताचीही महती सांगणारच.

तेथून बैठक हालली की, एखादा पांडबा शेतात काम करताना दिसतो. तो अण्णांना पाहून शेतातले काम सोडून तसाच नांगरटीतन ढेकळं तुडवीत तुडवीत येतो. आण्णाच्या हातावर तबाखूची चिमूट न मागताच सोडतो आणि न विचारताच ऐकतो 'अरं पांडबा, पोराला शाळेतनं काढू नको. त्येन शिकून शेती करूदे. त्येला शेतीच आवडतीया तर मी त्याला शेतकी शाळेत डिग्रजला घालतो. त्याला शेतकी शाळेत जायाचे नसेल तर, त्याला साताऱ्याच्या भाऊराव पाटलांच्या बोर्डिंगात घालतो. जर त्याला त्याच्या आईची माया सुटत नसेल तर, इस्लामपूरच्या शाळेत जाऊदे पण त्याचे तू लाड करू नकोस बघ.' मग पांडबा म्हणतो, 'आण्णा पोरग काय माझं ऐकत न्हाय बघा.' मग पोरालाही हाक मारली जाते. दबकत दबकत पोरग बुजऱ्या वासरासारख येत. कान पाडून ऐकतं. आणि वर्षा-भरान त्येच पोरग पास होऊन आण्णांच्या पाया पडून पेढा हातावर ठेवतं. तर आण्णा म्हणतात, 'आरे तूच खा पेढा. तू वर्षभर अभ्यास केलायास. खा. मला आपली बबनच्या दुकानातनं तबाखूची पुडीच आण.' असा हा माणूस. सर्वांचा आण्णा. सर्वांसाठी सदैव उभा. कुणाचा रागलोभ न धरता सतत सांगत राहायचे. सतत बोलत

राहायचे. त्यांच्यावरही कुणी रागावत नाही. कसे रागावणार हा माणूस ह्या भूमीसाठी चदनासारखा झिजतो. दिव्यासारखा तेवतो.

ह्या माणसाचे आवडीचे कार्यक्षेत्र म्हणजे पाण्याच्या योजना. याच उत्तम उदाहरण म्हणजे हा माणूस 'कृष्णा कॅनाल बागाईतदार सघाचा' १९४३ पासून सतत अध्यक्ष राहिला या काळात नानासाहेबाच्या प्रयत्नाने घडलेली शेती विकासाची स्थित्यतरे लक्षणीय आहेत. या कृष्णा कॅनालच्या आणि कृष्णाकाठाच्या बागाईती जमिनीच्या उत्पन्नाचा आलेख चढता होण्यात ह्या माणसाच्या समर्थ हाताचा, कल्पक डोक्याचा आणि अहोरात्र तळमळीचा फार मोठा वाटा आहे. ही कृष्णाकाठची बागाईत जमीन ह्या माणसाची ऋणाईत आहे. एखादा बाप, लाडक्या लेकीला जसा जोपासतो तसे नानासाहेबानी या बागाईतीची अनेक कल्पक छोटया-मोठया प्रकल्पानी जोपासना केली आहे कुठे पोट पाट खोदायचे. कुठे कॅनाल तरवून न्यायचा कुठे भुयारी न्यायचा. या कामात एखाद्या मुख्य अभियत्याइतकेच नानासाहेबाचेही कल्पक सहकार्य आहे सुपीक जमिनीचा कस टिकावा म्हणून पाण्याचा निचरा होण्यासाठी छोटे-मोठे नाले खोदून घेण्याची योजना नानासाहेबानीच आणावी. शासनातर्फे ती कामे असली तरी नानासाहेबांचा फेरफटका असतोच. एखादेवेळी कामावरचा साहेब नसला तर हा (नाना) साहेब कामगारांकडून तंबाखू खाऊन डोक्यावरची टोपी पट्टीसारखी हातात धरून त्याने दिशा दाखवीत रहाणार.

पूर्वी गुन्हाळातून उसाची कांडी खात फिरणारा हा साहेब मोकळ्या डोक्याने फिरला नाही. १९४० सालापासूनच यशवतराव मोहिते, दिनकरराव मोहिते, कोळ्याचे रगराव पाटील, दादासाहेब जगताप व नानासाहेब ह्यांनी साखर कारखान्याची योजना माडली. अविरत प्रयत्नानी १९५४ साली ती कल्पना साकार झाली. कृष्णा सहकारी साखर कारखाना उघडया माळावर उभा राहिला. आणि त्या कारखान्याने उघडया नागडया शेतकऱ्याना झाकून टाकले. भारतातला हा एक प्रगत कारखाना. कारखान्याच्या विकासात कारखान्याचे दोन चेअरमन; एक माजी चेअरमन व सध्याचे सहकार मत्री यशवतराव मोहिते व त्यांचेच बधू, सध्याचे चेअरमन जयवतराव भोसले याच्या इतकाच नानासाहेबाचा हिस्सा आहे, हे दोघेही चेअरमन बधू सांगण्यास कधी विसरत नाहीत. आज या साखर कारखान्यात वराहपालन, कुक्कुटपालन, शेतकरी सहकारी सघ, डिस्टिलरी इत्यादी अनेक पूरक प्रकल्पाचा समावेश आहे. तसेच साखर कारखाना आणि इस्लामपूर याच्यात दळणवळणाचा मोठा दुवा असलेला बहेपूल आण्णाच्या प्रयत्नाचा तर मोठाच साक्षीदार आहे.

१९५२ साली कोयनाधरणासाठी हेळवाकला कोयना परिषद झाली. सयोजक मडळीत शकरराव किर्लोस्कर, भाऊराव पाटील, भाऊसाहेब सोमण तसेच नानासाहेब सावंतही होतेच. धरण झाल्यावर त्याचे फायदेही नानासाहेबानी हलक्या हातांनी या परिसरात खेचून आणले. वीज आली. घरादारात गेली. खेडी झगमगू लागली. माणसे आनदली. तृप्त झाली. मात्र नानासाहेब अतृप्तच राहिले. त्यांना वाटायचे ही वीज राबवली पाहिजे. कृष्णेचे पाणी जमिनीत खेचले पाहिजे. मग कुठे चार-सहा माणसाचे टोळके दिसले की तंबाखू मळता मळता नानासाहेब म्हणायचे 'गोपाळराव, किर्लोस्करचा पंप बसवा बघू नदीवर. मळीत विजेचे खांब येत्याती.' त्यातल्या कुणालाच नाही पटले तर पुन्हा धोतराचा सोगा हातात धरून उठायचे. बऱ्यापैकी एखादे घर बघून त्या घरात शिरायचे. मग त्या घरातून बाहेर पडताना त्या घरातले बाळासाहेब म्हणायचे, 'आण्णा कोणता स्टार्टर घ्यायचा, ते तुम्हीच ठरवा. सोमवारी कोल्हापूरला जाऊन येऊया.' प्रतिसाद पाहून आण्णाना अधिक उत्साह येतो. तेथून तडक ते दलितवाडयात जातात. आण्णाना येताना पाहून हजर असलेला दलितवाडा पुढे सरसावतो. घोगडे पडते. त्यावर सातारी जर्दा आहेच. आण्णा लगेच आपले घोडे रिंगणात आणतात. जमलेली मडळी गालाला हात लावून चवडया चवडयावर बसलेली असतात. कोणीच बोलत न्हाय. मग आण्णाच म्हणणार, 'ह काय सोनाप्पा, साग साग. गप बसू नकोस' मग सोनाप्पालाही वाचा फुटते. म्हणतो 'आण्णा आमच्या गरिबांचा ह्यो घास हायका' पुन्हा आण्णाचा समजावणीचा सूर. 'आर तुम्ही सगळयानी मिळून सहकारी तत्त्वावर ही योजना करायची हाय. ह्यूमची पाईप मी क्रेडिटवर घेऊन देतो. भू-विकास बँकेचेही कर्ज काढून देतो. आर एकदा पाणी जमिनीत पडूदे मग सोनप्पा, तू सोन्याचा घास खातूयास की नाही बघ.'

आज १९७२ साल. कृष्णेच्या पोटात सिमेंटच्या कितीतरी नळया शिरतात. खासगी आणि सहकारी जलसिंचन योजना झाल्यात.

आण्णाचा पाणी योजनेचा अभ्यास प्रचड. तसाच कॅनॉल ड्रेनेजचा. तसाच आर्थिक कराचा. नवीन नवीन योजना वरिष्ठ अधिकाऱ्याना सारख्या सागत राहाणार. भातशेती सुरू झाली की आण्णाचा कराडला फोन. अर्थात कॅनॉलमध्ये लगेच पाणी येणारच कृष्णा कॅनॉलचा कमी क्युसेक्स पाणी पुरवठा झाला तर आण्णाची पर्यायी योजना तयार. नदीचे पात्र जेथे कॅनॉलला जवळ आहे तेथून नदीच्या पात्रातले पाणी उचलून कॅनॉलमध्ये सोडावे. वगैरे. वगैरे. बागाईतदार सघाच्या अनेक परिषदा त्यानी आपल्या विषयाच्या ज्ञानाने गाजवल्या आहेत एखादे उदाहरणच घ्यायचे म्हटले तर, अजितप्रसाद जैन याच्या अध्यक्षतेखाली नेमल्या गेलेल्या कमिशनपुढे त्याची जी साक्ष झाली त्यावेळी त्याच्या या पाणी योजनेच्या सखोल ज्ञानाचे सर्वांना आश्चर्य वाटले. त्याचा हा अभ्यास पाहून सध्याचे पाटबधारे मत्री श्री. वसंतदादा पाटील यानी नानासाहेबाना महाराष्ट्र राज्याच्या अशा प्रकारच्या अनेक योजनात सहभागी करून घेतले.

कोळेनरसिंहपूर ह्या कृष्णेच्या रम्य परिसरात व मच्छिंद्रनाथाच्या पुनीत प्रदेशात वसलेल्या गावात जन्मलेला हा माणूस. मॅट्रीकपर्यंतच शिकला. पण ज्ञानाने, कार्याने थोर झाला. गावासारखाच, मनानेही निरोगी सुदर झाला. ऐसपैस झाला. त्याचे वडील लक्ष्मणराव पाटील, शाहू महाराज व टिळकाचे मोठे चाहते. त्यानी अच्युतराव पटवर्धन, नाना पाटील, आप्पासाहेब पत, याच्यावरोबर कार्य केले होते तोच वारसा आण्णानी चालवला. ४८ साली जळीत आली. गावात ब्राह्मणाची घरे पुष्कळ. बाहेरगावची माणसे लॉऱ्या भरून जळीतासाठी आली. रगराव पाटील आणि नानासाहेब यानी निधडया छातीने आव्हान परतवले. इतक्या घरात फक्त एकच घर जळाले. तेही खासगी वैमनस्यातून. असा हा माणूस. स्वतःचा ससार न करता, कोणत्याही राजकीय गोतावळयात न शिरता, वाळवे तालुक्यातल्या कुऱ्हाडी काठच्या गावठी राजकारणात कोणाचाही पक्ष न धरता हा माणूस कृष्णेच्या पाण्यासारखा सथ वाहातोय. दोन्ही काठावरची भूमी सुपीक करीत आणि दोन्ही तीरावरच्या सुखदु:खाची जाणीव ठेवीत. □

# सोलकढी

## ☐ अजित लक्ष्मण वाडेकर

मुंबईच्या दादर या नामवत उपनगरात 'शिवाजी पार्क' हे विस्तीर्ण पटागण आहे. त्यात गेली काही वर्षे इमारतीचे अतिक्रमण हळूहळू होऊ लागले आहे. त्याबद्दल, पांढऱ्या कॉलरने वेढलेल्या गळ्यांना शोभेल व झेपेल अशा पद्धतीने, क्रीडासक्त शिवाजी-पार्कवासियांनी मऊ आरडाओरड चालवली आहे. एकूण अतिक्रमण आणि आरडाओरड दोन्ही एकसाथ चालू राहतील असे दिसते. असे असले तरी अजून शिवाजी पार्कवर मुबलक क्रिकेट दिसते. गभीरपणे चालणाऱ्या मोजक्या सामन्याच्या अवतीभवती हौशी गंभीरपणे अगणित सामने चाललेले असतात. या सगळ्या सामन्यांना उत्साही प्रेक्षकसुद्धा आयते आणि चिक्कार उपलब्ध असतात.

शिवाजी पार्क आणि आसपासचे सगळे वातावरण क्रिकेटमय आहे. शिवाजी पार्कच्या पोरांना अभ्यासातले फारसे समजत नसले तरी क्रिकेट बऱ्यापैकी समजते. कचेऱ्यातून काम करणाऱ्या तरुण मध्यमवयीन कामकऱ्यांनी पुष्कळ क्रिकेट पाहिले आहे. शिवाजी पार्कचे म्हातारे आपल्या दुखण्यांबद्दल आणि औषधांबद्दल जितके बोलत नाहीत तितके क्रिकेटबद्दल बोलतात. शिवाजी पार्कचे तान्हे मूल आपल्या सायसाखरी हातांनी खुळखुळा धरते तो म्हणे थेट क्रिकेटच्या बॅट सारखा.

अशा परिस्थितीत, शिवाजी पार्कच्या अजित वाडेकरला क्रिकेटर होण्यावाचून गत्यंतर नव्हते. महाविद्यालयात असताना तो गभीरपणे क्रिकेट खेळू लागला. लौकरच एक आक्रमक डावखोरा फलदाज म्हणून त्याचा बोलबाला झाला. त्याने बख्खळ धावा केल्या. पण भारतीय कसोटी सघात जागा खाली नव्हती. म्हणून अजित वाडेकरला पचविसाव्या वर्षापर्यंत रखडावे लागले. एकदा कसोटी सघात आल्यानतर मात्र त्याच्या यशाची कमान, परवाच्या इग्लंडच्या दौऱ्यापर्यंत, सतत आठ वर्षे, चढतच राहिली. १९७१ सालच्या वेस्ट इडिजच्या दौऱ्यासाठी त्याची कर्णधार म्हणून निवड झाली. पुढच्या तीन कसोटीमालिका त्याने ऐटीत जिकल्या.

भारतीय क्रिकेटच्या इतिहासात असे काहीतरी प्रथमच घडले होते. त्यामुळे भारतीय लोक आनदाने कासावीस झाले होते. त्यानी अजित वाडेकरचा 'हीरो' केला होता. अजित वाडेकरला दिव्य साक्षात्कार होतात; विजय मर्चंट त्याच्या स्वप्नात येऊन त्याला सल्ला देतो; कसोटी सामन्यात वापरला जात असलेला चेंडू त्याला फितुर होतो आणि झेल कोठे उडेल ते सुचवतो; यासारख्या आख्यायिका सर्वत्र फैलावत होत्या. अजित वाडेकरने आपल्याला जिकायची सवय लावली होती.

म्हणूनच यावर्षी माईक डिनेसच्या इग्लिश सघाविरुद्धदेखील अजित वाडेकर विजयीच होईल, विजयीच झाला पाहिजे, असे आपल्याला पक्के वाटत होते. पण भलतेच झाले. भारताची अगदी केविलवाणी ससेहोलपट झाली. अजित वाडेकर आपल्याला नेहमीच विजय मिळवून देऊ शकणार नाही, हे आपल्याला कळून चुकले. असा कर्णधार आपल्याला काय करायचा होता ? हे आम्ही आमच्या सभ्य आणि सुसस्कृत पद्धतीने अजित वाडेकरला सांगून टाकले.

अजित वाडेकरने योग्य तो बोध घेतला आणि कसोटीक्रिकेटमधून काढता पाय घेतला. कर्णधाराची काटेरी टोपी त्याने कायमची उतरवून ठेवली. येणेप्रमाणे, अजित वाडेकर कसोटी क्रिकेटमध्ये उशिरा आला आणि त्यातून लौकर बाहेर पडला. अर्थात, आपल्याकडची सगळी जबाबदार माणसे जशी तरुण रक्ताला वाव देण्यासाठी स्वेच्छेने बाजूला होतात तसाच अजित वाडेकर बाजूला झाला आहे. आता त्याला, गणित विषयाचा उच्च अभ्यास करणे किंवा हिंदी-मराठी चित्रपटात चरित्रअभिनेता होणे, या क्रिकेटपायी अपुऱ्या राहिलेल्या महत्त्वाकांक्षाचा झटून पाठपुरावा करता येईल.

निवृत्तीचा निर्णय जाहीर केल्यानंतर अजित वाडेकरने एक मुलाखत दिली. तिच्यात, सुनील गावस्कर आणि विश्वनाथ याच्यापैकी एकाचा अगामी कर्णधार म्हणून विचार व्हावा, असे त्याने सुचेवले. ठीक आहे. त्याने त्याचे काम केले. आपण आपले करू. जो हरूच शकणार नाही अशा कोणाला तरी आपण कर्णधार केले पाहिजे.

स्वत: अजित वाडेकर तसा कर्णधार असेल असे आम्हाला वाटले होते. पण तसे झाले नाही. नशिबाचा खेळ, दुसरे काय. परिणामी काल आम्ही ज्याला 'अजित वाडेकर' म्हणून ओळखत होतो त्यालाच आज आम्ही 'अजित लक्ष्मण वाडेकर' म्हणून सबोधू लागलो आहो. सबध नाव घेत ओळख विसरण्याचा हा प्रकार मोठा उद्बोधक आहे.

सुनील गावस्करचे सबध नाव आहे. सुनील मधुकर गावस्कर.

विश्वनाथचे सबध नाव आहे : गुडाप्पा रगनाथन् विश्वनाथ. ◻

## ☐ अमेरिकेचे ३८ वे राष्ट्राध्यक्ष

आपल्याकडे जो कधीतरी कलियुगात होणार आहे तो भ्रष्टाचार अमेरिकेत आत्ताच माजला आहे. त्यालाच कटाळून अमेरिकेचे ३७ वे राष्ट्राध्यक्ष रिचर्ड एम्. निक्सन यांनी राजीनामा दिला. त्याच्यामागून जेराल्ड आर. फोर्ड अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी विराजमान झाले आहेत. जेराल्ड आर. फोर्ड म्हणजे ओहोहोहोहोहो केवढा गगडगंब माणूस. पैजच लागली तर

आपल्या हाताने आपल्याच पाठीवर सही करू शकेल हा अजब इसम. ३८ वे राष्ट्राध्यक्ष जेराल्ड आर. फोर्ड शूर, धाडसी, प्रतिभावान, विनोदी, उद्योगी, अभ्यासू, विचारी, कनवाळू, कर्तव्यदक्ष, स्वार्थत्यागी, परोपकारी, न्यायी, निरिच्छ, निष्कपट, धोरणी, स्नेहशील, निगर्वी, शुद्धचरित, निष्ठावंत वगैरेवगैरेवगैरे आहेत. ३७ वे राष्ट्राध्यक्ष निक्सन असेच होते. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष असेच असतात. म्हणून तर अमेरिकन जनता आपल्या राष्ट्राध्यक्षावर बेभान प्रेम करते.

गेल्या काही दिवसात, अमेरिकेतल्या सगळ्या वर्तमानपत्रातून, नियतकालिकातून जेराल्ड आर्. फोर्ड यांची छायाचित्रे झळकत आहेत. त्यांच्यावरून असे वाटते की जेराल्ड आर्. फोर्ड यांना करता येणार नाही अशी एकसुद्धा गोष्ट या वीसबोटी माणसांच्या दुनियेत नाही. अहो या राष्ट्राध्यक्ष गृहस्थाला चक्क पावाचा टोस्ट करता येतो, आणि अंड्याचे ऑमलेट करता येते, आता बोला. (मला चहासुद्धा करता येत नसल्यामुळे राष्ट्राध्यक्ष-राष्ट्रपती-पंतप्रधान असे कोणी-होण्याच्या फंदात मी पडलोच नाही. पडून काही उपयोग नाही हे आधीच कळले होते मला.) एखाद्याला ही गोष्ट छोटी वाटेल; पण मोठ्यांचे काहीही छोटे नसते, हे आपण कधीही विसरता कामा नये.

आणि आपण नाहीच विसरत. अध्यक्ष माओ यांचे पोहोणे, एडवर्ड हीथ यांचे नौकानयन, एलिझबेथ राणीच्या टोप्या, गांधींचे (म्हणजे मोहनदास करमचंद गांधींचे. या नावाचे एक बॅरिस्टर आपल्या देशात होऊन गेले.) घड्याळ, पंडित नेहरूंचे लाल गुलाबाचे फूल, विन्स्टन चर्चिल यांचा चिरूट — वस्तुव्यक्तीसंबंधाची अशी स्मारके आपण पुन्हा पुन्हा निर्माण करतो; लोकशाहीत निर्माण करतो हे विशष.

जेराल्ड आर्. फोर्ड यांच्या टोस्ट-ऑमलेटचे असेच होईल, असे नव्हे; असे होणारच नाही, असेही नव्हे. आज आपण एवढे म्हणू शकतो की अमेरिकेच्या ३७ व्या राष्ट्राध्यक्षानंतरचे आणि ३९ व्या राष्ट्राध्यक्षांआधीचे ३८ वे राष्ट्राध्यक्ष जेराल्ड आर्. फोर्ड हे ३७ व्या आणि ३९ व्या राष्ट्राध्यक्षांसारखेच अद्वितीय पुरुष आहेत.

□



# चीन
## क्रांतीला अंत नसतो

वा. दा. रानडे

चिनी कम्युनिस्ट क्रांतीला एक ऑक्टोबरला पचवीस वर्षे पुरी झाली. चीनमध्ये खरोखर काय घडत आहे ? चिनी क्रातीने जगाला नवे काय दिले ? चिनी नेते मार्क्सवादापासून दूर गेले की मार्क्सवादात त्यानी नवी भर घालून कम्युनिस्ट चळवळीला नवे वळण दिले ? चिनी क्रातीच्या रौप्यमहोत्सवाच्या निमित्ताने या प्रश्नाचे वस्तुनिष्ठ विश्लेषण झाले पाहिजे १९६२ च्या चिनी आक्रमणापासून चीनशी आपले सबध सघर्षाचे आहेत. पण या सघर्षाने आपली दृष्टी दूषित होऊ न देता अनेक शतके मागासला राहिलेल्या चीनने पचवीस वर्षात देशाचा चेहरा-मोहरा बदलून टाकून आशियातील एक प्रबळ राष्ट्र हे स्थान कसे मिळविले याचा अभ्यास आपण केला पाहिजे व चीनपासून शिकण्यासारख्या गोष्टी जरूर शिकल्या पाहिजेत. प्रदीर्घ लेखच नव्हे तर पुस्तक लिहावे एवढा हा विषय मोठा आहे मी फक्त एक-दोन महत्त्वाच्या मुद्यांची चर्चा येथे करीत आहे.

माझ्या दृष्टीने चिनी क्रातीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे केवळ सरकार बदलून क्राती होत नाही तर समाजपरिवर्तनाचे कार्य सतत चालू ठेवावे लागते हे चीनने दाखवून दिले. चीनच्या ८० टक्के ग्रामीण जनतेला बदलण्यात तरुणानी महत्त्वाचा वाटा उचलला. त्याची सुरुवात येनानपासून झाली. 'सिया-सियाग' या नावाने ही मोहीम ओळखली जाते. या शब्दाचा अर्थ 'ग्रामीण जीवनात मिसळला.' खेड्यात चलण्याचा सदेश आपल्याकडेही महात्मा गाधी व इतर नेत्यानी दिला. मग चिनी नेत्यानी नवे काय सागितले ? त्याचे वैशिष्टय हे की त्यानी तरुणाना सघटित करून ग्रामीण भागात समाजपरिवर्तन प्रत्यक्ष घडवून आणले. जपानविरुद्ध युद्धाच्या काळात येनानमध्ये कम्युनिस्ट चळवळीचे मुख्य केंद्र असताना तरुणाच्या गटाना दूरच्या खेड्यातून पाठविण्यात येई ते शेतकऱ्याना शेतीच्या हगामाच्या कामात मदत करीत, त्याना शेतीच्या नव्या तत्राची माहिती देत आणि त्याच्या परपरागत समजुतीत बदल घडवून आणून त्याना विकासाचा व परिवर्तनाचा मार्ग दाखवीत. शहर आणि खेडे, कामगार आणि शतकरी, बौद्धिक आणि शारिरिक श्रम यातील फरक आणि विरोध नाहीसा करणे हा या मोहिमेचा एक उद्देश होता तो पूर्णपणे साध्य झाला आहे असे नाही, पण चीनच्या ग्रामीण भागातील जीवन बऱ्याच प्रमाणात बदलले आहे यात शंका नाही. चीनमधील सर्व माध्यमिक शाळातील विद्यार्थ्यांना शेतात किंवा कारखान्यात शारिरिक श्रम करावे लागतात. ही अट पुरी केल्यानंतरच कॉलेजे किंवा तांत्रिक शिक्षणाच्या शाळेत या मुलांना प्रवेश मिळतो. तरीही यापैकी बहुसख्य विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण सस्थात प्रवेशासाठी धडपड न करता शेतातच कामे करावीत अशी अधिकाऱ्यांची अपेक्षा असते. ग्रामीण भागात शिक्षण प्रसार वाढण्यास या मोहिमेचा निश्चित फायदा झालेला आहे. आज प्राथमिक शाळेत जाण्याच्या वयाची ९० टक्के मुले या शाळांत जात आहेत. ज्या गावात किंवा कारखान्याच्या भागात शाळा असतात तेथील लोकच या शाळाचा खर्च देतात. आपल्या प्राथमिक शिक्षण प्रसाराची मद प्रगती लक्षात घेता चीनची ही प्रगती विशेष डोळ्यात भरते. आपल्याकडील मद प्रगतीचे कारण सरकारी पातळीवर आणि सरकारी पद्धतीने होईल तेवढाच शिक्षण प्रसार आपल्याकडे होतो. या कार्यासाठी वाहून घेणारे कार्यकर्ते आपल्याकडे फार थोडे आहेत. आरोग्य कार्यक्रमाबद्दलही असेच म्हणता येईल. तरुण चिनी डॉक्टर खेडोपाडी, अनवाणी हिंडून लोकाना आरोग्याचे प्राथमिक ज्ञान देतो, उपचार करतो. आपल्याकडचे किती डॉक्टर खेड्यात काम करायला तयार असतात ? चीन व भारत याची येथे तुलना करावयाची नाही. चीनच्या साऱ्याच गोष्टी चांगल्या असेही म्हणावयाचे नाही. चीनमध्येसुद्धा सारे तरुण खेड्यामध्ये काम करायला स्वेच्छेने गेले असे नव्हे. पण ग्रामीण समाज बदलण्याची पद्धतशीर मोहीम चिनी नेत्याच्या मार्गदर्शनाखाली तेथे हाती घेण्यात आली व ती बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाली.


तरुणाचे सघटित आदोलन यशस्वी होऊ शकते हा अनुभव आपल्याकडेही आलेला आहे. गुजरातमधील तरुणांच्या आदोलनामुळेच चिमणभाई सरकार गडगडले व विधानसभा बरखास्त झाली. पण पुढे विद्यार्थी नेत्यामध्ये फूट पडली सध्याची सदोष निवडणूक पद्धती बदलली पाहिजे या मुख्य मागणीबद्दलचा आग्रह सुटला. आता पुन. निवडणुका झाल्या आणि पैशाच्या बळावर काँग्रेसच पुन: निवडून आली तर या आंदोलनातून काहीच साधले नाही असेच म्हणावे लागेल. समाज परिवर्तन होते ते केवळ आंदोलनाने किंवा सत्ता हाती आल्याने नव्हे तर त्यासाठी सतत कार्याची जरुरी असते. अशा कार्यातून समाज परिवर्तनाला वातावरण अनुकूल बनत जाते. निष्ठावंत कार्यकर्त्यांची सघटनाच असे कार्य करू शकते. चिनी कम्युनिस्टानी अशी संघटना उभारली म्हणून ते समाज बदलू शकले. आपल्याकडे सर्वच राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी नेहमी सत्ता सपादनावर भर दिलेला आढळतो. आमचे सारे राजकारण निवडणुकीशी आणि सत्तेशी निगडीत आहे. काँग्रेस काय किंवा विरोधी पक्षकीय साऱ्याच्या हालचाली मुख्यत: याच उद्देशाने चालतात. विरोधी पक्षाच्या आदोलनामागेही जनतेचा पाठिंबा मिळवून पुढच्या निवडणुकीत सत्ता मिळविणे हाच उद्देश असतो. समाज परिवर्तनासाठी समाजाची अनुकूल भूमिका तयार करण्याचे कार्य दुर्लक्षितच राहते.

चीनच्या सांस्कृतिक क्रांतीत काही अतिरेकी प्रकार घडले असतील पण भांडवलशाही मूल्ये व कल्पना याचे सपूर्ण उच्चाटन करण्यात ती बरीच यशस्वी झाली आहे. समाजाच्या आवश्यक मूलभूत गरजा प्रथम भागविण्यावर चिनी नेत्यानी भर दिला. रशियात भांडवलशाहीचे उच्चाटन झाले असले तरी वरिष्ठ अधिकारी व तज्ञ यांचा एक नवा वर्गच तयार झाला आहे. आपले राहणीमान वाढवून सुखासीन जीवन जगण्याकडे त्याची वाढती प्रवृत्ती दिसून येत आहे. या सुखासीन प्रवृत्तीतून पुन: भांडवलशाही मूल्याचा पगडा बसण्याचा धोका आहे. रशिया क्रातिमार्गापासून दूर जाऊन सुधारणावादी झाला आहे अशी आजच्या रशियावर चीनची टीका आहे. क्रातीची धार बोथट होऊन आपल्या समाजातही रशियाप्रमाणेच सुखासीनपणा येऊ नये. तो कसा टाळता येईल यासाठी चिनी नेत्यांची सारी धडपड आहे. सांस्कृतिक क्रांतीची मोहीम दर सात-आठ वर्षांनी करीत राहिले पाहिजे असे माओ म्हणतात त्यामागे हाच उद्देश आहे. दिव्यावर काजळी चढते त्याप्रमाणे ध्येयवादावरही कालातराने सुखासीनतेची काजळी चढत जाते. ही काजळी झटकून टाकून ध्येयवादाची—क्रातीच्या मार्गाची ज्योत पुन: प्रज्वलित करावी लागते. यासाठीच क्राति कधी सपत नसते हे उद्दिष्ट चिनी नेत्यानी पुढे ठेवले आहे.

चिनी नेत्यानी समाजवादी क्रातीचे कार्य करणारापुढे एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. हा प्रश्न सोडविण्याचा चीनचा मार्ग तुम्हाला पसत नसेल तर तुम्ही त्यावर टीका करून दुसरा मार्ग सुचवा पण हा प्रश्न व त्यातील धोका टाळता येणार नाही. हा प्रश्नच अस्तित्वात नाही असे म्हणणे म्हणजे आपली फसवणूक करणे होय. ☐

विमेदारांच्या हितासाठी

# तुमचा विमाहप्ता वेळच्यावेळी आणि योग्य कचेरीतच भरा




## त्यामुळे तुमची विमा रक्कम लौकर परत मिळण्यास मदत होईल.

विमाहप्ता योग्य मुदतीतच भरणं आवश्यक असतं. तसंच हप्ता भरताना पॉलिसीचा क्रमांक कळवणं आणि हप्ता योग्य कचेरीकडंच पाठवणंही तितकंच महत्वाचं असतं. शक्यतो हप्त्याबरोबर विमांहप्त्याची नोटिस पाठवणं चांगलं ! त्यामुळे रक्कम तुमच्या खात्यांत जमा करणं आणि तुम्हाला पक्की पावती ताबडतोब देणं सोयीचं जातं. तुम्ही भरलेले सर्व हप्ते तुमच्या खात्यात नमूद झाले की तुमच्या पॉलिसीची परतफेड विनाविलंब होते.

विम्याची रक्कम लौकर मिळण्यासाठी तुम्हाला आणखीही काळजी घेता येईल. पॉलिसीवर वारस नेमा. वयाचा दाखला सादर करून तुमचे वय मान्य करून घ्या. पत्ता बदलला असल्यास आयुर्विमा महामंडळाला नवीन पत्ता कळवा

तुमची पॉलिसी चालू आणि व्यवस्थित आहे, याची खात्री करून घेण्यासाठी ज्याच्याकडे तुम्ही पॉलिसी घेतलीत त्या विमाएजंटाचे साहाय्य घ्या–किंवा आयुर्विमा महामंडळाच्या नजिकच्या कचेरीशी संपर्क साधा.

**लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इन्डिया**

RADEUS/LIC/AS-2

# नगरचे मनोविकार शिबीर

डॉ. उल्हास लुकतुके

सुरेख इग्रजीत ती म्हणाली, ' मला जगावस वाटत नाही. मी एक दिवास्वप्न सतत पहाते. त्या स्वप्नात मी स्वत. फक्त प्रेक्षक असते. समोर माझे प्रेत असत. आणि ज्या तरुणान मला नाकारल तो शोक करीत असताना मला दिसतो.

' सततपणे दिसणाऱ्या या स्वप्नाचा त्रास होतो म्हणून तू मनोविकारतज्ञाकडे आलीस का ?'

' नाही, या स्वप्नाचा मला त्रास होत नाही. उलट त्यात मी रमून जाते. फक्त जेव्हा मी स्वप्नातून बाहेर येते तेव्हा मला असे जाणवते की माझ्या जीवनातले सप्तरग निघून गेले आहेत. आजूबाजूचं सगळ जग मला राखट-भुरकं भासत. आणि मग जीव द्यावासा वाटतो. आत्महत्येचा विचार मानसिक रोगाचं लक्षण आहे हे मला माहीत आहे. म्हणून मी आले.'

मनोविकारतज्ञासमोर एक फॉर्म होता. त्याच पेन एका शब्दावर थाबलं होतं. शब्द होता ' इनसाईट ' त्यापुढे झरकन शब्द उमटला, ' गुड '.

¤

त्याचे नातेवाईक वैतागून गेले होते. त्याला धरून बाधून आणला होता. गचांडी मारून त्यांनी त्याला पुढे ढकलला आणि म्हणाले, ' बघा ह्यो चळित्र डाक्टर ! आठ-पधरा दिवसा अदुगर सोळा आने हुता पन यवढ्यातच झालाय ह्यो असा यटाम.' पेशट विलक्षण घाबरलेला होता. डॉक्टरच्या चेहऱ्याकडे पहात तो म्हणाला, ' अगागा, काय ह्यो समदा घोळ हाय. आरं रामा रामा. माजा समदा बावचा क्येला त्यानी.' डॉक्टर म्हणाले, ' कुणी त्यानी ?' तर हा एकदम गडबडीने उठला व कपडे झटकीत म्हणाला, ' नगा बाबा नगा, तुमी बोलू नगा. बोलल की जणू तुमच्या त्वाडातून आळ्या पडत्यात. ह्ये काय माज्या समद्या अगावर आळ्या हिडून राह्यल्यात.'

¤

नतरचा तो प्रोफेसर – प्रथम त्याचं वक्तव्य अगदी धारदार वाटले. पाच-दहा मिनिटानी लक्षात आले की एवढ्या वेळात काहीच भरघोस मुद्दा त्याने माडलेला नाही आहे. शब्दाच्या जंजाळाखाली स्वत.च्या विचाराचा धूसरपणा तो झाकू इच्छित होता. तो आला होता ' आजकाल शिकवण्यात हव तस लक्ष लागत नाही ' अशी तक्रार घेऊन.

¤

शेकडो माणसे. कुणी हसू गमावलेली कुणी आसू गमावलेली. कुणाला खिन्न वाटते आहे, कुणाला जादा हसू येत आहे. कुणाच्या विचाराचा गोधळ होत आहे. कुणाचे कामाकडे लक्ष नाही. कुणाला वाटत आहे सर्व लोक आपल्या वाईटावर आहेत. कुणाला दमा झालेला आहे. कुणाला फिट्स येत आहेत. कुणाच्या अगावर इसब उठलेले आहे. एक ना दोन. हजारो तक्रारी. सर्वांचा उगम मनातून. सर्व मनोविकाराचे रोगी.

अशी ही हसू हरवलेली माणसे जमा झाली होती अहमदनगरच्या गुणे नर्सिग होम भोवती. नर्सिग होमवर निळ्या सोनेरी अक्षरात पाटी झळकत होती ' मोफत मनोविकार शिबीर – ७ व ८ सप्टेंबर ७४ – रोटरी क्लब अहमदनगरच्या विद्यमाने.'

नगरच्या रोटरी क्लबसमोर भाषण करताना मी मनोविकाराची निरनिराळी रूपे वर्णन करून सागितली होती. माझ्या भाषणाचा एकदर रोख असा होता, की मनोविकार म्हणजे वेडेपणा – फक्त वेड्याच लोकांनी मनोविकार तज्ञाकडे जावे ही सामान्यपणे रूढ असलेली कल्पना चूक आहे. व मनोविकारावर लवकर इलाज केले तर ते निश्चित बरे होतात. परंतु लवकर इलाज करण्यासाठी ते लवकर लक्षात आले पाहिजेत व लवकर लक्षात येण्यासाठी लोकांचे मनोविकाराबद्दलचे सामान्य ज्ञान वाढले पाहिजे. व रोटरीसारख्या समाजसेवा करू इच्छिणाऱ्या क्लबला आपल्या कम्युनिटी सर्व्हिस या विभागातर्फे याबाबत पुष्कळ करता येण्याजोगे आहे. ही कल्पना रोटरी, अहमदनगरच्या सभासदाना आवडली. रोटरीचे अध्यक्ष श्री. भोजवानी हे तरुण, उत्साही व तडफदार आहेत. त्यांच्याशी चर्चा करताना मी मनोविकार शिबिराची कल्पना मांडली. तिच्यातील नाविन्य जाणून ती त्यानी एकदम उचलून धरली. आणि रोटरीचे चक्र फिरू लागले. ७ व ८ सप्टेंबर ७४ या तारखा ठरल्या. गुणे नर्सिग होमचे सुपरिंटेडेट. डॉ. अशोक गुणे यांनी हॉस्पिटलची इमारत, रहिवासी डॉक्टर्स व नर्सेस इत्यादींची सेवा उपलब्ध करून देण्याचे मान्य केले. रोटरीने मला ऑर्गनायझिंग सायकिॲट्रिस्ट म्हणून नेमले.

शिबीर म्हटले की काही झटपट ट्रीटमेंट व तिचे झटपट रिझल्ट्स् डोळ्यासमोर येतात. मनोविकार शिबिराचे तसे नसते. पेशट्स्ची ट्रीटमेंट बराच काळ चालते. तेव्हा त्या दृष्टीने १० आठवडे, दर आठवड्यातून एकदा पेशट्स्चा फॉलो अप ठेवण्याचे मी मान्य केले. पेशट्स्ना काही काळपर्यंत फुकट औषधेही द्यावीत असे मी सुचवले. त्याप्रमाणे युनिकेम, एस. के. एफ्., सर्ले, एथनॉर, न्यू लाईफ, रोश इत्यादी कपन्यानी फुकट औषधे दिली ती रोग्याना वाटण्यातही आली.

मनोविकार शिबीर ही कल्पना नवीन असल्याने पेशट्स् येतील की नाही ही शका काहींनी व्यक्त केली तेव्हा मनोविकार म्हणजे कसे व काय असतात याबाबत मार्गदर्शन करणारे काही लेख स्थानिक वर्तमानपत्रांनी प्रसिद्ध केले. काही रोटरियन्सची सिनेमागृहे आहेत. काहींचे प्रेस आहेत. तेव्हा गावात सगळीकडे पोस्टर्स–बॅनर्स लागली. सिनेमागृहातून स्लाईड्स् दिसल्या. त्याचप्रमाणे इंडियन मेडिकल असोसिएशनच्या अहमदनगर ब्रँचला सहकार्याची विनती केली. त्यांनी मनोविकारावर माझी दोन भाषणे ठेवली. जिल्ह्यातील सर्व डॉक्टर्सना या शिबिराबाबत रोटरीने पत्रे पाठवली. तसेच सामाजिक कार्यकर्ते, जेलर्स, रिमाडहोमचे सुपरिटेडेट–ज्याचा विकृत मनाशी सबध येतो अशा सर्वांना सहकार्याची विनती केली. एवढे झाल्यावर मग नावे नोंदविणाऱ्या पेशट्स्ची सख्या झपाट्याने वाढू लागली. म्हणता म्हणता ४१०

पेशंट्सनी नावे नोंदवली. मिरजेचे डॉ. बी. एम. देवसिकदार व पुण्याच्या मेंटल हॉस्पिटलचे सुपरिटेंडेंट डॉ. बी. एल. चांदोरकर यांनी येण्याचे मान्य केलेच होते. पण रुग्णांची संख्या एवढी झाल्यावर डॉ. प्रकाश साठ्ये, डॉ. सौ. अनिता अवचट, क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट श्री. के. एल पाटील व सोशल वर्कर श्री. कोठी यांना मी विनंती केली व त्यांनी सर्वांनी येण्याचे मान्य केले.

उदघाटनासाठी मंत्री श्रीमती प्रतिभा पाटील व श्री. दा. ता. रूपवते आले होते. पुण्याहून श्री. निळूभाऊ लिमये मुद्दाम आले होते.

सर्व पेशंट्सची व्यवस्थित व शास्त्रीय तपासणी करण्यात आली. आवश्यक तेव्हा खास मानसिक चाचण्या करण्यात आल्या. निरनिराळी औषधे फुकट देण्यात आली. परत तपासणीच्या तारखा लिहून देण्यात आल्या व नंतर चहा-फराळ देऊन प्रत्येक पेशंटला पाठवण्यात आले.

शिबीर संपल्यावर अनेक गोष्टी लक्षात आल्या. या शिबिरात ३५० पेशंट्सवर इलाज करण्यात आला. आजपर्यंत इतके मोठे मनोविकार शिबीर इतरत्र कोठेही भरवण्यात आलेले नाही व कालानुक्रमाने सर्व विकार वाङ्मयात हे फक्त ३ रे शिबीर आहे असे आढळून आले.

'न्यूरॉसिस' म्हणजे काळजी लागणे, अकारण भीती वाटणे, छातीत धडधडणे इत्यादी लक्षणे असलेला मनोविकार असलेले रुग्ण आमच्या अपेक्षेपेक्षा खूपच जास्त संख्येने आले. त्यावरून जनतेचे मनोविकाराबाबतचे मन बदलत आहे असे अनुमान काढण्यास हरकत नाही.

पुष्कळसे रुग्ण स्वतःहून आले. त्यांना कोणी पाठवले नव्हते. यावरून मनोविकाराबाबत असलेली जाण वाढत आहे व मनोविकार या शब्दावर असलेला काळा डाग काही अंशी जात आहे असे वाटते.

फिट्स् व जन्मतः बुद्धीमंदता असलेली मुलेही खूप आली. आपल्याकडे या मुलांसाठी वेगळ्या व स्वस्त शाळा नाहीत. याची तीव्र व दुःखदायक जाणीव यावेळी झाली.

शिबिराचे बहुतेक रोगी नगर जिल्ह्यातील होते पण पुणे, नाशिक, सोलापूर, औरंगाबाद इत्यादी जिल्ह्यातूनही रोगी आले होते. मनोविकारावर उपचाराची सोय किती मोठ्या प्रमाणावर व निरनिराळ्या जागी हवी आहे हे त्यावरून लक्षात आले.

तरुण पिढीतील बरेच डॉक्टर्स, मेडिकलचे व सायकॉलॉजीचे विद्यार्थी दोन्ही दिवस पूर्ण वेळ काळजीपूर्वक मनोविकार समजावून घेत होते. मनोविकाराबाबत बदलत असलेली व जास्त उदार वृत्तीच यातून प्रतीत होते.


समारोपासाठी रोटरी डिस्ट्रिक्ट ३१४ चे गव्हर्नर श्री. जासूभाई मेहता मुद्दाम आले होते. त्यांनी या शिबिराचे फारच कौतुक केले. या शिबिराचा उपक्रम अगदीच नवीन असल्याने वर्तमानपत्रांनीच नव्हे तर रेडिओ व टेलिव्हिजन यांनीमुद्धा शिबिराची बातमी दिली.

शिबिराबाबत जे काही हेतू होते ते साध्य झाले. रोटरीची समाजसेवा झाली. मनोविकाराबाबत सामान्य जनता थोडी का होईना जास्त समजुतदार झाली. आणि शेकडो पेशंट्सना उपचार झाले.

शिबीर संपले.

आम्ही बाहेर पडलो. काही पेशंट्स् मुद्दाम थांबले होते. त्यांना आमचे आभार मानायचे होते. त्यांच्या चेहऱ्यावर हसू होते.

यापेक्षा कोणतेच मोठे बक्षीस आम्हाला मिळू शकले नसते. □



### ताईच्या मनात पुन्हा कढ येतात....

# रमेश गेला कां ?

# बडी माँ

लेखिका : सौ. विजया काळे

रमेश ही संस्था सोडून निघून गेला ! 'ताईला हे कितीक वेळ खरं वाटलं नाही ! रमेशची समोर पडलेली चिट्ठी 'मी ही संस्था सोडून जातो आहे ! प्रत्यक्ष निरोप घेणं अवघड वाटल असत म्हणून आपणा उभयताना न भेटता जातो आहे–'

शेवटच्या वाक्यानं ताईच हृदय भरून येत अन् अजूनही आश्चर्य कमी होत नाही. कधी ध्यानी मनी नव्हत ते घडल कस ! रमेश ही संस्था सोडणार आहे अस जर कुणी नुसत म्हटल असत तर ताईनी त्याला वेड्यातच काढलं असत ! पण आज ते घडल होत ! वीटभर चिट्ठी लिहून रमेशने इतक्या वर्षाचे ऋणानुबंध तोडून टाकले होते ! संस्थेचे ताईबाबाचे ! आश्चर्य कमी होत नव्हत अन् एकीकडे खत वाटत होती 'रमेश असा का गेला ! त्याच्या मनात अस का आल ! एका शब्दान देखील आपल्याला विचारावस त्याला का नाही वाटल !' कोड सुटल नाही.

टेबलाभोवती सकाळच्या चहाची अन् गप्पाची मैफल रगात आली आहे ! ताई बाबाच्याकडची पाहुणे मडळी म्हणजे नेहमीच सतरा धान्याच कडबोळं ! आज तर त्याला जागतिक सभेच स्वरूप आल आहे ! श्रीलकेचा एक पोरसवदा इंजिनियर, दोन जर्मन तरुणी, राजकारणात खळबळ माजवणारी अन् बाबाच्या आश्रयाला आलेली एक व्यक्ती, कुणी लेखक समाजसेवक अन् विटन ट्रॅक लिहिणारा आर्थर ! दिसण्यात अती देखणा, बुद्धीमान अन् अति साहसी असलेला हा ब्रिटिश माणूस पागळा आहे ! पण पागळा असूनही सार जग हिंडलेला आहे ! आणि इथे मात्र तो मूल होऊन ताई-बाबाच्या गळ्यात पडलेला आहे !

ह्या असल्या कोंडाळ्यातल्या गप्पा म्हणजे दोघांनाही अतिशय आनद !

बाबाच्या बोलण्याचा खळखळाट, कळकळ डोळ्यातले अश्रू, घरगुती आग्रह, विनोदाची, हास्याची कारंजी, एखाद्या सुदर इंद्रधनुष्या-इतक आकर्षक ! पाहुणे मडळी परकेपण विसरून या सोहळ्यात गुतून पडलेली !

ताईही त्यात नेहमीप्रमाणे रस घेण्याचा प्रयत्न करते पण आज मन त्यात लागत नाही ! टेबलासमोरच्या दरवाजातून आब्याचे मोहरलेले वृक्ष दिसताहेत ! मधूनच वाऱ्या-बरोबर एखादी सुगधी लाट पाहुण्यापर्यंत येऊन पोहोचते ! त्या पलीकडे मोठ्या वृक्षाची पानझड झालेली ! एवढा थोरला वृक्ष उघडाबोडका झालेला आणि त्यामागची प्रिंटिंग प्रेसची छोटेखानी इमारत ! रमेशची ती कर्मभूमी ! ह्या प्रिंटिंग प्रेसची सारी जिम्मेदारी त्याचीच ! ती इमारतही दीन झाल्यासारखी वाटते ! ताईच्या मनात पुन्हा कढ येतात ! रमेश गेला का !

एवढ्या अवाढव्य संस्थेत, कार्यात अस नेहमीच घडत असत ! जिवाला जीव देणारे भेटतात, तसे कुणी निघूनही जातात ! पण रमेशची गोष्ट या सर्वापेक्षा फार निराळी होती !

ताईच्या नजरेसमोर त्याचं बालपण उभ रहात ! त्याच्या आईबापाना कसल्या विचित्र रोगाचा संसर्ग झाला म्हणून हे अशक्त लुकड पोर त्यांनी ताईच्या ओटीत घातल ! खर म्हणजे आतापर्यंत अशा रोगानी पिडलेल्या आईबापाची कितीतरी पोरं ताईनं स्वतःच्या ओटीत घेतली होती ! पण कुणी काही दिवसांचे सोबती ! कुणाचे नातेवाईक येऊन त्याना घेऊन जातात !

पण हे पोर ताईच्या आधाराला आलं अन् तिचच होऊन बसलं ! ताईच्या निगेनं ते पोर थोडफार टवटवीत झालं ! जरा गाल वर आले ! अगावर मास धरलं !

ताईच्या मुलाबरोबर ते शाळेत जात होतं, खातपीत होत ! जिवापाड जपलेल्या अकुरा-तून सुरेख रोपटं अग धरीत होतं !

आणि ताईला जी धास्ती वाटत होती तीच एक दिवस खरी ठरली ! त्या पोराला सपाटून ताप आला अन् नतरची विचित्र जखम ! ताईला माघार माहीत नव्हती ! तिन अहोरात्र त्याची सेवा केली ! जखमा धुतल्या ! अर्थात हे तर ताईच व्रतच आहे ! मर्यादेबाहेर गेलेल्या रोग्याच्या जखमेतले किडेदेखील तिन धुवून काढले आहेत तिथे हे काहीच नव्हत !

ताईच्या प्रयत्नाना यश आल अन् काही दिवसात ते पोर रोगमुक्त झाल !

ते दुखण्यातून उठल अन् तेव्हापासून विरक्तच झाल. ताईच्या मुलाबरोबरीने त्याला कपडालत्ता शिवला जात होता पण तो निरिच्छ ! चागल्या कपड्यात, चागल्या खाण्यात त्याला स्वारस्यच नव्हतं ! पण त्याची ही विरक्तीही इथ कुणी चालवून घेतली नाही ! त्याने फाटकेतुटके कपडे घातलेले ताईला खपत नव्हत म्हणून हे पोर धड कपडे घाली ताईचा धाक म्हणून !

ताईची मुल मोठी झाली ! सुरवटाची फुलपाखर झाली ! पण हे पोर मात्र अजून ताईच्याच कोशात गुरफटलेल ! शिकल सवरल अन् संस्थेच्या कामात गढून गेल ! ताई, बाबा, त्याच कार्य, ही संस्था ह्याव्यतिरिक्त त्याला दुसर जग नव्हत ! दुसरा कशात त्याला रस नव्हता !

तारुण्याचा उबरठा ओलाडला अन् त्याच्यावर संस्थेच्या मोठमोठ्या जबाबदाऱ्या टाकण्यात आल्या. बाबानी सांगितलेला सारा मजकूर शब्दबद्ध करण्याचं काम याचंच अन् संस्थेच्या प्रिंटिंग प्रेसची सारी जबाबदारी याच्यावरच ! आणखीही वेळप्रसगी निघणाऱ्या कामाची जिम्मेदारी याचीच ! पण कधी 'नाही' नाही, कधी चुकारपणा नाही, कधी खत नाही ! हे काम हा त्याचा धर्मच

झाला होता ! आणि ताईबाबांच्या सावलीतच रहायचं एवढच त्याला माहीत होतं !

ताई आणि बाबा हे कर्मठ कर्मयोगी असण्यापेक्षाही तत्पर आईबाप आहेत ! त्यांनी त्याच्यावर कुठलीही बधनं घातली नव्हती ! स्वत च्या मुलांनादेखील स्वतत्रपणे विचार करण्याची अन् त्यानुसार वागण्याची मुभा ! तिथ ह्या मुलाचा प्रश्नच नव्हता ! पण हा कधी वाकडा तिकडा वागलाच नाही. उलट अतिशय विरक्त ! कुठल्याही सुखाची, भोगाची त्यानं इच्छा केली नाही. त्यासाठी कधी आसुसला तर नाहीच नाही ! ह्या तरण्याताठ्या मुलाच बैरागी होऊन रहाणं ताईला पसत नव्हत ! इतर तरुण मुलांप्रमाणे त्यान वागाव, माणसासारखच वागाव ही तिची इच्छा होती ! त्याच्या लग्नाचं नाव काढल तरी तो सर्वांना झटकून टाकीत होता !

अन् एक दिवस ताईकडे कुणी एक अश्राप मुलगी आश्रयाला आली ! अशी कितीतरी प्रकारची माणस ह्या उबदार आश्रयासाठी येत असतात !

ही मुलगी बघितली अन् ताईला आनद वाटला. रमेशची ही सहधर्मचारिणी चांगली शोभेल ! त्याला ती चारचौघासारखा ससार करायला लावील ! आयुष्यात रस घ्यायला लावील !

त्या मुलीच सकट ताईन निवारलं अन् रमेशपुढे प्रश्न टाकला, 'तुला ही पसत आहे ' रमेश गागरला ! घाबरला ! ताईसमोरून निघून गेला ! ताईला अजूनही त्याचा तो बुजरा चेहरा आठवतो आहे ! ताईला गदगदून येत. ती बाबाकडे बघते. ताईच्या मनात अस प्रचड वादळ माजलेल ! अन् बाबाच्या गावीही ही गोष्ट नाही ! नवे सकल्प, नव्या योजना याची जोरदार चर्चा टेबलाभोवती चाललेली ! पाहुणे मडळी चहाची दुसरी फेरी सपवून पुन्हा सारे ऐकण्यासाठी आसुसलेली !.

ताईला एकदा वाटत की रमेशचा उच्चार करावा ! 'उद्यापासून प्रिंटिंग प्रेसची जबाबदारी घेणार कोण ? म्हणून विचाराव ! पण जिभेवर आलेले शब्द मागे फिरतात. नित्य बाबाचा स्वभाव माहीत आहे. ह्या माणसाला पाठीमागच्या गोष्टीत रेंगाळण माहीत नाही. एकसारखी पुढची ओढ ! डोक्यावर छप्पर आलं की हा माणूस अस्वस्थ होतो ! आकाशाखाली रहायला, रानावनाचा मोकळा वारा प्यायला आसुसलेला हा माणूस घनघोर जगलातून हिंडताना वाघ समोर आला तर त्याच्यापुढे खुशाल उभा राहाणारा हा माणूस ! अशी सिंहासारखी छाती असलेल्या माणसाला ह्या क्षुल्लक गोष्टीसाठी–पुन्हा गप्पांची रगलेली मैफल ताईला विस्कटावीशी वाटत नाही !

ताईची खंत कमी होत नाही. 'रमेश गेला का ! ताईन त्याला सुदर आयुष्य लाभाव म्हणून खस्ता खाल्ल्या. आणि त्याही पोरांनी ताईला दैवत मानलं होत ! मग अस काय घडलं !

ताई मनातल्या मनात पुन्हा बारकाईने सारे प्रसग तपासते ! रमेश लग्न करायचं नाही म्हणाला पण ताईनं त्याच मन वळवण्याचा प्रयत्न चालवला. तो आपला नाही नाही म्हणत होता ! ताई म्हणत होती रमेश विचार कर ! फार चागली सधी आली आहे ! असा सडाफटिंग किती दिवस रहाणार !'

तो गप्पच ?

ताई म्हणे 'रमेश लग्नाशिवाय आयुष्याला पूर्णत्त्व नाही ' रमेश खबीरपणे म्हणे 'माझ आयुष्य माझ्यासाठी नाहीयेच ! मी ते सस्थेला वाहिलय् ! ह्या कार्याला वाहिलय् !'

लग्नान त्याला बाध येत नाही. माझा अनुभव आहे. इतराचा अनुभव आहे. इथे असलेले सारे कार्यकर्ते विवाहितच आहेत !

तरी पण मला लग्नाच्या बधनात अडकायच नाही ! व्रतस्थपणे हे कार्य करायच आहे !'

ताईच्या कपाळावर सूक्ष्म आठ्या पडत. शब्दाना धार आली होती. उगीच शाब्दिक वाद नको आहे ! वेड्या भावनेच्या पोटी असा निर्णय घेशील नी मग कदाचित जन्मभरही हळहळत बसशील म्हणून सांगते.

ताईन लग्नाचा विषय त्याच्या गळी उतरवला ! पुन्हा त्या पोरीच्या शशाकुशका. तिच्या पालकांच म्हणणं ! कितीतरी प्रश्नचिन्ह ! अडचणी ! पण साऱ्यातून ताईनं वाट काढली होती ! अन् रमेशच्या डोक्यावर जेव्हा अक्षता पडल्या तेव्हा ताईला स्वस्थ वाटल होतं !

संस्थेच्या चिमुकल्या जगानं रमेशचं भावविश्व फुलल होते ! वठलेला वृक्ष अकुरत होता ! जिवाभावाच्या सखीत इतक्या दिवसाच एकलेपण रमेश विसरला ! तिच्या सहवासात रमला होता तरी संस्थेचं कार्य पहिल्याच तत्परतेने करीत होता ! ताईवरची श्रद्धा तिळभरही कमी होत नव्हती !

ससारी माणसाची कर्तव्य आता त्याला होतीच ! आणखी एक मन त्याला जपाव लागल होत, साभाळाव लागत होतं ! तिच्या लहरीप्रमाणे, तिच्या मनासारखं कराव लागत होत !

ससारी माणसासारखा तो वागला तर इथे कुणाला राग येणारच नव्हता ! खरं म्हणजे त्यान तस वागाव, आपल्या आयुष्यात रस घ्यावा ही तर ताईची इच्छा होती ! मायेन अन् प्रेमान घातलेले चार सुखाचे घास अन् चार सुखाचे क्षण त्याला लाभावेत त्यासाठी तर ताईने केवढे प्रयत्न केले होते ! तो सुखाकडं पाठ फिरवीत होता तरी ताईनं त्याच्या पदरात ते माप घ्यायला लावलं होत !

आणि–आणि– या बदल्यात काय तर आज तो न सागता सवरता निघून गेला होता ? जाण्याबद्दल कधी बोलला नाही. इथं रहाण्याबद्दल कधी धुसफुसला नाही, कधी नाराजही नव्हताच !

आणि आज तो ताईला नुसता आश्चर्याचा धक्का देऊन गेला नाही तर प्रिंटिंग प्रेसच काम अस वाऱ्यावर सोडून निघून गेला ! थोडासा हा विश्वासघात होता !

एवढ्या मोठ्या प्रचड व्यापातही बाबाच अन् ताईच लक्ष फार बारीक असत ! प्रत्येकाशी त्याची सपूर्ण ओळख झालेली असते ! पण जपायच, समजून घ्यायच, समाळायचं ते कोवळ्या रोपट्यांना ! जो वृक्ष खबीर आधारात उभा आहे त्याला सावरायला इथे कुणाला वेळ नसतो. अन् त्याची जरूरही भासत नाही.

म्हणूनच मधल्या काही काळात अगदी बारीक नजरेने ताईने कधी रमेशकडे बघितलच नाही ! पुन्हा त्याच काम इतकं शात अन् व्यवस्थित चालल होत की त्यामध्ये ढवळाढवळ करायची गरजच वाटली नव्हती.

ताईला एकदम आठवलं. धागे जुळायला

लागतात. कुणीतरी काही दिवसापूर्वी म्हणत होतं रमेश प्रिंटिंग प्रेसमध्ये काम करणाऱ्या एक-दोन मुलांना रमेश करतो ते काम शिकवीत होता. त्यांच्याकडून काम करून घेत होता. धडे गिरवून घेत होता. पुन्हाही कुणीतरी ताईला म्हणाल होत रमेशने ती पोरं प्रिंटिंग प्रेसच्या कामासाठी चांगलीच तयार केली आहेत. आता ती कुठेही अडणार नाहीत. ताईला जरा मोकळं वाटल निदान काम तरी अडणार नाही. बाबांना तर पुढे पुढेच पाऊल टाकायचं. मागे कुणी खड्डा करून ठेवला तर निस्तरण किती कठीण जात. ताईवरच ती जिम्मेदारी येऊन पडते. पुन्हा योग्य माणस मिळत नाहीत. पण रमेशने आपल्या जागी कुणी निर्माण करून ठेवलय.

रमेशची ही चागली बाजू मनात येते अन् ताईची अस्वस्थता कमी होते. विचारांचा दुसरा प्रवाह सुरू होतो. इतके दिवस रमेश सावलीसारखा राहिला हेच आश्चर्य आहे. स्वतंत्र मनाच हे मुळी लक्षणच नाही. एका रमेशला उशीरा का होईना ही वाट सोडून दुसरीकडे जावस वाटल. स्वतत्रपणे विचार करता आला. स्वतत्रपण जगण्याचं आव्हान त्यान स्वीकारल. खरं म्हणजे यातच आपली जित आहे. हे आपल यश आहे

आणि–आणि–रमेश असाच म्हातारपणापर्यंत ह्या कामाला चिकटून राहिला असता तर–तर–इतर काम करणाऱ्याना वर जाण्याची सधी कशी मिळाली असती. त्याच्या कर्तबगारीला वाव कसा मिळाला असता ! रमेश सोडून गेला हे त्याच्या हाताखालच्या लोकाना देखील आवडत असेल. नक्की ! म्हणजे रमेशला इतका खोल विचारही करता येत असावा.

ताई–ताई सुटकेचा निश्वास टाकते. पुन्हा विचाराची मालिका आणि–आणि तो आपला निरोप प्रत्यक्षपणे घेणारच कसा. आणि प्रेमातल्या आणि जिवाभावाच्या माणसाचा असा निरोप कधी घेताच येत नाही. तो निरोप घेण अशक्य होत. रमेशचं आपल्यावर, बाबावर जिवापलीकडे प्रेम होत म्हणूनच त्याला निरोप घेण कठीण वाटल. जिवावर आल. कदाचित त्या क्षणी त्याच पाऊलही मागे वळलं असत – नाही–नाही– असं होता उपयोगी नाही.

झाल तेच ठीक झालं !

ताई खाड्कन भानावर येते. बाबा नेहमीप्रमाणेच मोठ्या उमेदीने उद्याच्या जाण्याबद्दल बोलत असतात. पुन्हा ते जंगलातल आयुष्य आभाळाच छप्पर. झाडाच्या भिंती.

मध्येच ते म्हणतात, 'इदु उद्या पहाटे तीनला निघायचय्.'

'ठीक आहे.'

'नुसत ठीक नाही. बरोबर आर्थर आहे. सिलोनचे पाहुणे आहेत.'

कुठेही बिऱ्हाड पाठीवर घेऊन जा. पाहुणे आपले चिकटलेले. त्या जगलात तर साऱ्याची व्यवस्था करायची म्हणजे केवढी यातायात. त्यातून आर्थर यायचा म्हणजे त्याच्या ढकलगाडीपासून ते नेस्काफेच्या डब्यापर्यंत लक्षात ठेवायला हव.

ताई झटक्यात उठते. तयारी करायला हवी. एकवेळ धडधाकट माणसाचं काही विसरल तरी चालेल पण आर्थरच सार सामान लक्षात ठेवून नेलं पाहिजे. ते ताईचं पागळ मूल आहे ! □


# M/s. CHEMOIL CORPORATION

**5/7, Sayed Mukarji Street**
**BOMBAY 400 009**

Gram : C/o 'Icconoil'

Administrative Office : 313, Sardar V. P. Road
Bombay 400 004

Phone : 351305 - 350401

हैदराबाद मुक्तिसंग्रामातील एक अज्ञात कथा

# लिंगदल्ली विमोचक भाऊराव पाटील

अशोक परळीकर, परभणी

'क्या बकते हो? उस काफीर भाऊराव पटेलने जमादारको तमाचा लगाया? दोनो जमादारको एक दिन मकानमें कैद कर रखा? लाहोल विला कुवत! अरे, सल्तनत किसकी है? हुजूर निझाम सरकारकी या उस काफीर पटेलकी? पंधरा अगस्तको तिरगा फहराने के जुर्ममें पूछताछ करके पटेलको हिरासतमें लानेके लिए जमादारको भेजा गया तो हरामजादेने उन्हेही सजा दी! पटेल खुदको क्या समझता है? उसका यह बर्ताव हमें हरगिज बर्दाश्त नही होगा! हम उसे जिंदा पकड लायेंगे या गोलीसे उडा देंगे। हमारे होते हुवे उस कमजात पटेल की यह हिंमत? उस बेहुदेने इस बर्तावसे मौतको ललकारा है।' – गोर्टा गावी रझाकाराच्या बैठकीत रझाकार नेता हिसामोद्दीन तावातावाने बोलत होता. त्याचा चेहरा रागाने लाल झाला होता. डोळ्यात रक्त उतरले होते. अगदी थरथरत होते. एवढे सत्तापल्याजोगेच घडले होते.

१५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. इकडे हैदराबादच्या निझामाने स्वतःस स्वतंत्र घोषित केले. राज्यातील बहुसंख्य प्रजा हिंदू होती आणि ती त्याला अनुकूल नव्हती. काही गावात काही धाडसी हिंदूनी तिरंगा ध्वज फडकाविला. निझामाला हा अपमान असह्य झाला. सरकारने अशा द्रोही लोकांना पकडून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई सुरू केली. बीदर जिल्ह्यातील होनल्ली गावच्या भाऊराव पाटलाने तिरंगा ध्वज फडकाविलाच परतु हैदराबादने भारतात विलीन व्हावे असे वक्तव्यही केले. मग काय? प्रकरणाची चौकशी करण्यासाठी दोन तगडे मुसलमान जमादार भाऊरावकडे आले. त्यांचे उद्धट बोलणे, वागणे भाऊरावला पसत पडले नाही आणि त्याने एका जमादाराच्या कानशिलात सणसणीत चपराक ठेवून दिली. एवढेच नव्हे तर त्याच्या गैरवर्तणुकीबद्दल त्याना आपल्या घरात डाबून ठेवले. भाऊरावाच्या साथीदारांनी त्या दोघाना 'उडविण्याची' परवानगी मागितली. परतु भाऊरावाने परिस्थितीचा विचार करून, नकार दिला. आणि दुसऱ्या दिवशी त्या दोघाना मुक्त केले.

ही अघटित वार्ता वाऱ्याने चहुकडे नेली. होनल्लीपासून केवळ दोन मैलावर असलेल्या क्रूरकर्मा हिसामोद्दीनला हे वृत्त कळले तेव्हा त्याच्या अगाचा तिळपापड होणे स्वाभाविक होते. आपण इतके जवळ असताना काफीर भाऊरावाने अशी हिंमत करावी हे त्याला मानवण्यासारखे नव्हते. प्रचड तयारीनिशी होनल्लीकडे, भाऊरावाला पकडण्यासाठी त्याने कूच केले.

भाऊरावला हे अपेक्षित होते. त्याने निरोप पाठवून आजूबाजूच्या खेड्यातून आपल्या मित्राना बोलावून घेतले. सशस्त्र रझाकार आणि शस्त्रसज्ज निझामी सैनिक यांच्या तुलनेत भाऊरावाची शक्ती कमी होती. त्यामुळे लढणे म्हणजे आत्महत्याच ठरेल तेव्हा सध्या सर्वांनी निसटावे असे ठरले. भाऊराव आणि त्याचे साथीदार दिवसभर अपेक्षित हल्ल्याची प्रतीक्षा करीत होते. परतु हल्ला झाला नाही. भाऊरावची तयारी कितपत आहे याची नीटशी कल्पना नसल्यामुळे हिसामोद्दीनने सरळ चढाई केली केली नाही: त्याला धाडस करवले नाही. वाट पाहून पहाटे चार वाजता भाऊराव आपल्या साथीदारासह होनल्लीहून निसटला.

होनल्लीहून भाऊराव निसटला हे कळताच हिसामोद्दीनच्या अगात वीरश्री(!) संचारली. त्याच्या पथकाने होनल्लीवर कडवा हल्ला केला. त्याला प्रतिकार होणे शक्यच नव्हते. माघ पौर्णिमेचा तो दिवस, रझाकारांच्या दीन दीन आवाजाने, क्रूर अत्याचाराने, पाशवी बलात्काराने, असहाय्य हिंदू स्त्री-पुरुषाच्या किंचाळण्याने, अमावास्येची अधकारी रात्र ठरली. भाऊराव पाटलाचे घर अक्षरश: लुटण्यात आले आणि सर्वत्र लुटून झाल्यावर पाटलाच्या घराला आग लावण्यात आली. त्या आगीच्या उजेडात हिसामोद्दीनच्या चेहऱ्यावर ओसडणारा राक्षसी आनद शोभून दिसत होता. मनसोक्त अत्याचार आणि बलात्कार करून झाला तेव्हा दीन दीन असा आवाज करीत त्या सैतानानी जाळपोळ सुरू केली. त्याच्या हातात कोलीत असल्यावर वेगळे ते काय घडणार? आपल्या सैनिकाच्या त्या पराक्रमाकडे हिसामोद्दीन अभिमानाने पहात होता. मध्येच हात उचावून तो म्हणाला, 'किधर है पटेल? डरपोक साला. आज अगर मिल जाता तो गाजर-मूली जैसा काट फेकता! नामर्द कहीं का!'

आपल्या पश्चात केलेल्या अन्याय, अत्याचार, बलात्काराच्या वार्तेने भाऊराव खवळून उठला. विशेषत: हिसामोदीनचे बोलणे सागितले गेले तेव्हा तर त्याच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. त्याने म्हटले, मी नामर्द? हा भाऊराव नामर्द? त्या बाटग्या हिसामोद्दीनला मारून होनल्ली प्रकरणाचा सूड घेतला नाही तर भाऊराव पाटील नाव सागणार नाही!

प्रतिज्ञा करून भाऊराव शात बसला नाही एकदर प्रकाराने तो अस्वस्थ झाला होता. तो आपल्या साथीदारासह हिसामोद्दीन व्यापारानिमित्त नेहमी कल्याण (बीदर जिल्ह्यातील एक महत्त्वाचे व्यापारी केंद्र)–ला जात येत असे. तेव्हा त्याला गाठावयाचे म्हणजे याच रस्त्यावर हे पक्के होते. भाऊराव आपल्या साथीदारासह, रझाकारांचा गणवेश करून गोर्टा–कल्याण मार्गावर 'नजर' लावून बसले.

हिसामोद्दीनचे भाग्य जबरस्त म्हणून तो यांच्या क्षेत्रात आलाच नाही. जणू मृत्यूनेच त्याला दूर ठेवले भाऊरावची अवस्था वेडघा-सारखी झाली. त्याचे साथीदार त्याचे समाधान करण्याचा प्रयत्न करीत. परंतु भाऊराव सूडाने उभा पेटलेला होता त्याला हिसा-मोद्दीन हवा होता. हिसामोद्दीनचा अधुक पत्ता मिळाला तरी तो तिकडे वळे आणि रात्रदिवस त्याची वाट पहात दबा धरून बसे. तहानभूक कशा कशाची पर्वा नव्हती त्याला. त्याचे लक्ष्य एकच हिसामोद्दीन– क्रूरकर्मा हिसामोद्दीन !

तसे म्हटल्यास हिसामोद्दीनचे वडील आणि वडिलांकडील सर्व नातेवाईक हिंदू होते. १९२८ मध्ये उसळलेल्या दंग्यात आपल्या मुलाला वाचवावे म्हणून एका विधवा हिंदू स्त्रीने मुसलमानाचा आश्रय घेतला. मुलाने मुसलमान धर्म स्वीकारल्यासच त्याला सरक्षण दिले जाईल असे त्या दयाळू (!). आश्रयदात्याने सांगितले. काय करणार होती ती अबला? भद्रप्पाचा बद्रोद्दीन झाला. आणि पुढे याच बद्रुद्दीनने या हिंदूद्वेष्टया हिसामोद्दीनला जन्म दिला.

फाल्गुनी पौर्णिमा जवळ येत चालली होती. सण जवळ येऊनसुद्धा बाहेर पडून सामान खरेदी करण्याची चोरी होती. साखर, तेल, कपडा, इत्यादींच्या खरेदीसाठी त्याना (गोर्टेकराना) कल्याणला जाणे अत्यावश्यक होते. पण जाणार कसे? रस्त्यातील रझाकारांनी सर्वस्व लुटून वर हत्यार चालविले तर–? हिंदूना आपल्या असहाय्यतेची जाणीव तीव्रतेने व्हावयास लागली. परंतु त्यांचे ग्रह उच्चीचे म्हणून रझाकार सालार हिसामोद्दीन, आपल्या चार सशस्त्र अंगरक्षका-सह, कल्याणकडे जाणार हे त्याना कळाले. त्यांनी हिसामोद्दीनला भरपूर 'खडणी' दिली तेव्हा त्याना सुरक्षित नेण्या-आणण्याची जबाबदारी हिसामोद्दीनने पत्करली. गोर्टाहून ४०–४५ बैल गाड्या, सामानाने भरलेल्या, हिसामोद्दीनच्या सरक्षणात मध्यरात्रीनतर कल्याणच्या रस्त्याला लागल्या. हिंदू गावकरी आता निर्धास्त होते.

गोर्टाहून ७०–८० माणसासह आणि ४०–४५ बैलगाड्यासह हिसामोद्दीन कल्याण रस्त्याला लागला हे कळून भाऊरावाला अत्यानद झाला. त्याने आपल्या साथीदारांना एकत्र केले आणि तो म्हणाला, 'मित्रहो, आजची सधी ही माझ्या दृष्टीने अत्यत महत्त्वाची आहे. आज एक तर हिसामोद्दीन राहील किंवा मी मी जर मारला गेलो तर तुम्ही हिसामोद्दीनला ठार मारा. हिसामोद्दीन तसाच निसटला तर माझा आत्मा अतृप्त राहील आज रात्री तो कल्याणहून नक्की परतेल. आजची रात्र त्याची शेवटची रात्र ठरली पाहिजे.'

भाऊराव त्यावेळी घाटबोराळ या गावी होता. त्याच्या साथीदारानी रझाकाराचा गणवेश चढविला. आणि शस्त्रे उचलून ते बाहेर पडले. भाऊराव गभीर आणि विचार-मग्न दिसत होता. रस्त्यात कोणी कोणाशी बोलत नव्हते त्या शांततेत त्याच्या लयबद्ध चालण्याचाच आवाज काय तो ऐकू येत होता.

सायकाळ झाली. हळू हळू अधाराचे साम्राज्य सर्वत्र पसरू लागले. रातकिड्याचा आवाज सुरू झाला. धनुरा आणि मुचलम या गावाच्या मध्ये एका आडवळणाच्या जागी हे चौदा बहाद्दर दबा धरून बसले. जवळच एक छोटासा नाला होता.

एक-दोन-तीन-चार! चार तास उलटले परतु कल्याणकडून येणाऱ्या बैलगाड्याचा आवाज ऐकू येईना. मडळी कटाळली परतु आज हिसामोद्दीनला प्रायश्चित द्यावयाचेच या निश्चयाने त्यांनी आसन सोडले नाही. पहाटचे तीन वाजले. थंड वारा सुटला होता. अनेक दिवसात डोळ्याला डोळा नसल्यामुळे झोप येण्याची दाट शक्यता होती. परतु त्या सर्वांनी मरगळलेल्या मनाला दिलासा दिला, सावध केले. कारण दूरवर कल्याण मार्गाकडून बैलगाड्याचा आवाज ऐकू येत होता. बैलांच्या गळ्यातले घुगरू लयबद्ध वाजत होते. त्या सर्वाचा आवाज ऐकून त्यांच्या निराश मनाला आशेचे अकूर फुटले. तो आवाज जवळ येऊ लागला तसा भाऊरावाने सर्वांना 'तयार'चा आदेश दिला. सर्वांनी शस्त्रास हात घातला. आणि उजळत्या प्रकाशात, येणाऱ्या बैलगाडीकडे ते डोळे ताणताणून बघू लागले.

बैलगाड्या नाल्याजवळ येताच सर्वांनी त्याना घेरले. गाडीवाल्यानी रझाकारांना पाहिले मात्र त्याची बोबडी वळली. ते हातापाया पडून विनवणी करू लागले. भाऊरावाने शोधक दृष्टीने सर्व गाड्यांवरून आपली नजर फिरवली. हिसामोद्दीन त्याला दिसला नाही. त्याने गाडीवानाना 'कोणत्या गावच्या गाड्या? असा प्रश्न विचारताच 'गौडगावच्या' असे भीतभीत त्यानी उत्तर दिले. मनातल्या मनात ते परमेश्वराची आळवणी करू लागले. भाऊरावाने त्याना जाण्यास सांगितले. त्याना आश्चर्याचा धक्काच बसला. त्यांचा स्वत:च्या कानावर विश्वास बसला नाही. विनाअन्याय–अत्याचार रझाकाराच्या हातून सुटका? शक्य नाही. हे रझाकार इतके दयाळू कसे? असा ते मनाला प्रश्न करतात तोच 'गाड्या ताबडतोब हाकता का नाही?' असा दरडावणीचा प्रश्न कानी आला. त्यानी पूर्ण शक्तिनिशी बैलाच्या शेपट्या पिरगाळल्या आणि त्याना चौखूर पळवले. शात वातावरणात पळणाऱ्या गाड्याचा आणि घुगराचा आवाज कितीवेळ तरी कानावर येत होता. त्या बैलगाड्या दिसेनाशा झाल्या तेव्हा भाऊराव आणि साथीदार पुन्हा दबा धरून बसले.

पहाट झाली. अधाराचे साम्राज्य विरळ होत होत लयाला गेले. सारी रात्र डोळ्यात तेल घालून हिसामोद्दीनची वाट पहाणारे भाऊराव उठले त्याचा चेहरा निराश होता. 'त्या' गाड्याची येण्याची शक्यता आता जवळ जवळ नव्हतीच. त्यानी साथीदाराना चलण्यास खुणावले भाऊरावाच्या चेहऱ्यावर राग, त्वेश, निराशा, असहाय्यता अशा अनेक भावनाचे जाळे दिसत होते. साक्षीदार जागा सोडून उठले तोच दूरवर बैलगाड्यांचा आवाज ऐकू येऊ लागला. आवाज कल्याण-कडून येत होता. सर्वांचे चेहरे उजळले. हिसामोद्दीनचा 'ताफा' येत असावा याबद्दल त्याना खात्री वाटली सर्वांनी आपापल्या जागा घेतल्या.

बैलगाड्या नाल्याजवळ येताच त्यांना थाबण्यास सांगण्यात आले. गाड्या थाबल्या. गाड्या अडविणारे रझाकार पाहून गाडीवाल्याना भय वाटले नाही. कारण रझाकार सालार त्याच्या बरोबर होता. रझाकारानी गाड्या थाबविल्या हे पाहून हिसामोद्दीनने स्वत:चा परिचय सांगितला. आणि तरीही रझाकार आपल्याकडे वळताहेत हे पाहून त्याने रायफल चालविली. त्याचा नेम चुकला

तसा भाऊरावचा मुद्दा चुकला. गाडीवाल्यांनी रझाकारांवर (!) चौफेर गोटामार केला. परंतु भाऊरावाने ओरडून स्वतःची ओळख देताच 'गोटामारा' थांबला. गाडीवाले नेहमी 'गोटासज्ज' असत.) भाऊराव पाटलाने आपणास गाठले हे हिसामोद्दीनच्या लक्षात आले. त्याला प्रचंड धक्का बसला. तो आपल्या धक्क्यातून सावध होतो न होतो तोच गाडीवर चढलेल्या घाटबोराळच्या रामराव पाटलाने बंदुकीच्या दस्त्याने त्याला असा तडाखा हाणला की तो खाली कोसळला. 'सालार' खाली पडताच रझाकार थांबतील कशाला? त्यांनी पार्श्वभागाला पाय लावून पळण्याचा प्रयत्न केला. दोघेजण गोळीला बळी पडले. आणि उरलेले पळण्यात यशस्वी झाले.

भाऊराव आडव्यातिडव्या पडलेल्या हिसोमोद्दीनच्या जवळ आला. त्यांनी बंदुकीच्या नळीने त्याला सरळ केले. हिसामोद्दीनचे डोळे उघडले तो त्याला भाऊरावाच्या रूपात साक्षात मृत्यू दिसला. त्याने भाऊरावाची करुणा भाकली; जिवदान देण्यास परोपरीने विनवले पण भाऊरावाने हिसामोद्दीनला गोळी घातली आणि होनल्ली प्रकरणाचा सूड घेतला. आता चांगलेच फटफटले होते. भाऊराव आपल्या साथीदारांसह भारतीय हद्दीत 'वाघदरी कँपवर येऊन पोहोचला.

भाऊरावाचे धाडस, शौर्य, आणि योजकता यामुळे तेथे त्याच्याकडे नेतृत्व चालून आले. निझामी राज्यात शिरून रझाकारांना आणि उपद्रवी मुसलमानांना ठोकण्याचे आणि अप्रत्यक्षरीत्या निझामी सत्तेला सुरुंग लावण्याचे कार्य तो साथीदारांसह मनोभावे करू लागला. त्याच्या पथकाने 'लिंगदल्ली' या सीमेजवळील ग्रामावर हल्ला करून रझाकारांना आणि उपद्रवी मुसलमानांना हुसकावून लावून मुसलमान देशमुखांच्या गढीकडे मोर्चा वळविला. भाऊराव पाटील येतो आहे हे कळताच तो भ्याड मुसलमान देशमुख गढी सोडून पळाला. अजून पोलीस अॅक्शन व्हावयाची होती. भाऊरावाने लिंगदल्लीला तत्पूर्वीच मुक्त केले होते. तेथील निझामी राजवट, अत्याचारी सत्ता संपुष्टात आणली होती.

भाऊरावाने गढीत आपल्या मुक्तिसेनेसह प्रवेश केला आणि जिंकलेल्या गढीवर विजयचिन्ह म्हणून तिरंगा ध्वज फडकाविला.

तिरंगाध्वज आकाशात दिमाखाने फडकू लागला तेव्हा भाऊरावांचा चेहरा आनंदाने उजळला. त्याने एकवार आपल्या मानबिंदूकडे पाहिले. आणि तो उंच स्वरात म्हणाला, 'भारतमाता की जय! त्याच्या साथीदारांनी या कार्यातही त्याला साथ दिली. दीन-दीन या आवाजाची सवय असलेल्या परिसरात आज प्रथमच 'भारतमाता की जय' हा आवाज दुमदुमला. □


डोळे झांकले तरी चव कांहीं लपत नाहीं!

ताजी, कुस्कुरीत व चवीला आगळीच –
वा! ही तर साठे माल्टेक्स बिस्किटेच!

ही आगळी वेगळी रुचिसंपन्नता माल्टमुळेंच या बिस्किटांत आहे. पचायला हलकी व भरपूर पोषक द्रव्यें असलेली माल्टेक्स बिस्किटें कितीही खा पुन्हा पुन्हा खावीशी वाटतात ती या माल्टमुळेच!

आजच खरेदी करा अन् फरक पहा जरा!






heros'-SBC-52 MAR

पुस्तके

# काव्यरसास्वादासंबंधी एक लक्षणीय ग्रंथरचना

प्रा. सुरेश जोशी

प्रा. गो. म. कुलकर्णी हे नाव आज मराठी टीका वाङ्मयात अग्रभागी आहे. वेळोवेळी प्रसिद्ध होणारे त्यांचे टीका लेख व 'खंडनमंडन'सारख्या त्यांच्या लेखसंग्रहाद्वारा त्यांच्या मोजक्या पण संस्मरणीय, तसेच आस्वादन-आलोचनाच्या कक्षा रुंदावणाऱ्या समीक्षणाचा मराठी वाचकांना परिचय आहे. 'रसग्रहण : कला आणि स्वरूप' हा त्यांचा ग्रंथ पारंपरिक स्वरुपाच्या शालेय पातळीवरील रसग्रहणापुरता मर्यादित नाही. पुस्तकाची बैठक काव्यसमीक्षेतील अभिनव आणि मूलभूत विचाराने तयार झालेली आहे. नेमक्या शब्दात बोलावयाचे झाल्यास Applied Poetics च्या क्षेत्रात हा एक लक्षणीय ग्रंथ प्रसिद्ध झाला आहे; नव्हे तसा तो व्हावा म्हणून लेखकाने जाणीवपूर्वक प्रयत्न केला आहे. म्हणून मध्यवर्ती कल्पना, रचनापद्धती, शब्दालंकार, वृत्तरचना वगैरेंच्या काहीशा तांत्रिक स्वरुपाच्या शालेय रसग्रहण पद्धतीला बाजूस टाकून, मराठी काव्यक्षेत्रात गेल्या दोन अडीच तपात जो आमूलाग्र बदल घडलेला आहे त्या संदर्भात, प्रा. गो. म. कुलकर्ण्यांनी सौंदर्यपूर्ण आस्वादनाची एक नवी दृष्टी प्रस्थापित केली आहे.

प्रस्तुत ग्रंथ वाचल्यानंतर आणखी एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे काव्यविषयक तात्त्विक चर्चा आपल्याकडे बरीच झाली आहे; पण या तत्त्वचर्चेचा प्रत्यक्ष काव्य–आस्वादनाशी मेळ कसा घालावयाचा किंवा त्याचे उपयोजन (application) कसे करावयाचे याबद्दल विशेष लेखन मराठीत झालेले नाही. त्यामुळे अभ्यासलेली काव्यचर्चा व एखाद्या कवितेचे आस्वादन यामध्ये सामान्य वाचकाला नेहमीच तफावत आढळते. 'रसग्रहण...' पुस्तकद्वारा प्रा. गो. म. कुलकर्णी यांच्यासारख्या ख्यातनाम समीक्षकाकडून ही तफावत भरून काढण्याच्या दृष्टीने एक भरीव प्रयत्न झाला आहे. विवेचनाच्या ओघात प्रा. गो. मं. नी कितीतरी कवितांचे अंतर्बाह्य सौंदर्य उकलून दाखविले आहे. एखाद्या नव्या कवितेचे ढोबळमानानेच आकलन झालेल्यांना अशा विवेचनामुळे त्या कवितेचे मर्म ओळखण्यास प्रेरणा मिळावी; नव्हे तेच या पुस्तकाचे उद्दिष्ट आहे. Applied Poetics च्या संदर्भात या पुस्तकाचा मघा निर्देश केला तो एवढ्यासाठीच.

शीर्षकात स्पष्ट केल्याप्रमाणे 'कला आणि स्वरूप' या दोन विभागात ग्रंथाची रचना केलेली असल्याने उपरोक्त तफावत दूर करण्याचा नेटका प्रयत्न झाला आहे. 'कला' विभागात काव्यसृष्टीचे अपूर्वत्व, काव्याचे बाह्यांग व अंतरंग, कलानंद व कलेचे कार्य इ. ची सर्वस्पर्शी चर्चा करण्यात आली आहे. काव्यातील भावनेचे स्वरूप, काव्यातील विविध प्रकार, रचनाबंधाची विविध अंगे या सर्वाबरोबर नव काव्याविषयी लिहिलेले स्वतंत्र प्रकरण मुद्दाम निर्देशण्याजोगे आहे. वीस-पंचवीस वर्षापूर्वी नवकवितेचे मराठीत आगमन झाल्यानंतर तिच्या मूल्यमापनाविषयी मतामतांचा गलबला मराठी टीका क्षेत्रात निर्माण झाला होता. आज त्या वादातील बराचसा घुरळा खाली बसला आहे. नवकवितेने केलेल्या क्रांतीविषयी बहुतांशी एकमत झाले आहे. तथापी आजही नवकाव्याच्या नव्या स्वरुपाची सहृदय रसिकाच्या नात्याने ओळख करून देण्याची गरज संपलेली नाही. प्रा. गो. म. कुलकर्ण्यांनी या ग्रंथाद्वारा ते कार्यही साधले आहे.

या विभागाचे आणखी एक वैशिष्टच म्हणजे काव्यरसग्रहणविषयक बहुविध अंगांची इथे चर्चा केलेली असली तरी रसग्रहणासंबंधी कोणत्याही स्वरुपाची तंत्रमंत्राची चौकट निर्माण करण्याचे लेखकाने कटाक्षाने टाळले आहे. रसग्रहण हा आत्मनिष्ठ स्वरुपाचा वैयक्तिक अनुभव असल्याची पूर्ण जाणीव ठेवून या क्षेत्रातील 'हा अखेरचा शब्द नसून केवळ आरंभबिंदू आहे.' हे लेखकाने स्पष्ट केले आहे. त्यामधून त्यांची विशुद्ध कलादृष्टी स्पष्ट होते.

प्रस्तुत ग्रंथाचा दुसरा भाग अधिक वैविध्यपूर्ण झाला आहे. कारण आधुनिक मराठीतील काही निवडक कवितांची प्रत्यक्ष रसग्रहणे सादर करतांना प्रा. कुलकर्ण्यांनी केवळ स्वतःच्याच रसग्रहणांचा समावेश न करता भिन्न भिन्न अभिरुचीच्या साहित्य समीक्षकांची रसग्रहणे दिलेली आहेत. कवितांची निवड करताना जसे एक विशिष्ट सूत्र सांभाळले आहे तसेच त्यांचे समीक्षकही त्या त्या काळातील व भिन्न अभिरुचीचे निवडले आहेत. स्वतःच्या रसग्रहणांचा अपवाद सोडल्यास समीक्षकांची पुनरुक्ती टाळली आहे. 'सतारीचे बोल' व 'चाफा'सारख्या विशेष कवितेची भिन्नदृष्टीची दोन दोन रसग्रहणे मुद्दाम सादर केलेली आढळतात. केशवसुतापासून ते आरतीप्रभू पर्यंत महत्त्वाच्या कवींच्या सुमारे आठरा कविता निवडल्या आहेत. यामध्ये माधवज्यूलियन यांच्या कवितेची कोठेच वर्णी लागू नये हे मात्र खटकते. रसग्रहणाबरोबरच काही कवीनी निवेदन केलेल्या स्वतःच्या कवितेच्या जन्मकथा पूरक ठरल्या असून खुद्द कलावंतालाही कवितानिर्मितीचे रहस्य कसे आकलन दुर्लभ असते याची कल्पना येते. खऱ्याखुऱ्या रसिकाने अव्वल दर्जाचा रसास्वाद घेण्यासाठी इतर ललित कलांशी किमान परिचित होणे कसे महत्त्वाचे आहे याची कल्पना शेवटच्या परिशिष्टातील गद्यशैली, चित्रकला व संगीत या संबंधीच्या उताऱ्यातून येते. काव्यास्वादाची पातळी उंचावण्याच्या दृष्टीने ते अत्यंत उपयुक्त ठरते.

या ग्रंथाला 'रसग्रहणा'ऐवजी 'रसास्वादा'सारखे एखादे अधिक प्रौढ व अर्थपूर्ण शीर्षक दिले गेले असते तर त्याच्या अंतरंगाच्या दृष्टीने ते उचित झाले असते. तथापी रसग्रहणाची व्याप्ती ललितकलांच्या आस्वादनापर्यंत विस्तारणाऱ्या या ग्रंथाद्वारे केवळ विद्यार्थ्यांची अभिरुची संपन्न होईल असे नव्हे तर काव्य रसिकांची अभिज्ञता नित्यनूतन ठेवून काव्यसमीक्षकांनाही पुनर्विचारास तो उद्युक्त करील, याबद्दल खात्री वाटते. ◻

**रसग्रहण : कला आणि स्वरूप**
प्रा. गो. म. कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०
मूल्य १२ रुपये.

मध्यंतर

# वासनाकाण्डचा प्रयोग

पुष्पा भावे

महेश एलकुंचवार यांच्या 'वासनाकाण्ड' या नाटकाचा पहिला प्रयोग 'अनिकेत'-च्या सभासदांसाठी 'रवींद्र नाट्यमंदिरा'त सादर केला गेला. या नाटकाचे दिग्दर्शन अमोल पालेकर यांनी केले होते.

'होळी', 'यातनाघर', 'सुलतान' यासारख्या एकांकिका आणि 'रुद्रवर्षा' 'गार्बो' 'रक्तपुष्प' यासारख्या नाटकांचे कर्ते म्हणून मराठी रसिकांना महेश एलकुंचवार या नाटककाराचा परिचय होताच. आजच्या अनेक तरुण नाटककारांप्रमाणेच एलकुंचवारांच्या नाट्यानुभवात उग्रपणा आहे. शिवाय कोणत्याही अनुभवाला सामोरे जात असता त्यांच्यातला चिंतनशील कवीही सतत जागा असतो. त्यामुळे आपल्या अनुभवाचा नेमका रंग, नेमके तर्कशास्त्र अजूनही एलकुंचवारांना गवसलेले नाही. प्रगल्भ अनुभव व्यक्त करतानाही त्यांच्या मनाचा अतिरिक्त हळवेपणा ते आवरू शकत नाहीत. नाट्यात्म अथवा नाट्यरूपी विधान मांडीत असताही तत्त्वज्ञानात्म तर्कशास्त्रीय विधानाची ओढ त्यांना वाटते. त्यामुळे असेल अथवा प्रत्यक्ष प्रायोगिक रंगमंचाशी निकटचा परिचय नसल्यामुळे असेल परंतु अजून तरी त्यांना रंगमंच भाषेवर (Theatre language) प्रभुत्व मिळवता आलेले नाही. अथवा ज्या अर्थाने अच्युत वझे यांना रंगमंच-भाषेचे स्वतःसाठी नवे रूप गवसले आहे तसेही त्यांना गवसलेले नाही. कलावंताच्या एकूण प्रवासाचा विचार करता मात्र चटकन् उत्तर सापडणे धोकादायक वाटते. त्यामुळे अशी आशा वाटते आहे की एलकुंचवारांना आज जरी रंगमंचीय उत्तरे सापडली नसली तरी उद्या सापडतील ती महत्त्वाची असतील. कारण ते जे प्रश्न विचारीत आहेत ते लक्षणीयच आहेत.

'वासनाकाण्ड' हे नाटक अमोल पालेकर यांनी दिग्दर्शित केले. गेले वर्षभर ज्या-प्रकारच्या निर्मितीसंकल्पनासाठी पालेकर प्रसिद्धी पावले होते त्यापेक्षा 'वासनाकाण्ड' या नाटकाचे स्वरूप अगदी वेगळे आहे. त्यामुळे पालेकरांनी 'गोची' व 'चल रे भोपळ्या...' नंतर 'वासनाकाण्ड'ची निवड करावी हे मला त्यांच्या नाट्यविषयक दृष्टि-कोनाच्या संदर्भात फार हितावह वाटले. कारण नाटकाविषयी जुन्यांनी फार एकांगी दृष्टी ठेवली असे म्हणताना आपण नवेही नाटकाविषयी फार संकुचित दृष्टी बाळगू लागलो तर ही प्रायोगिक रंगमंच चळवळ इतिहासाला फार काही देऊ शकणार नाही.

'वासनाकाण्ड'च्या नाट्यसंहितेच्या प्रारंभी नाटककाराने हार्डीच्या 'Jude the obscure' उल्लेख केलेला आहे. हा उल्लेख कथानक वा नाट्यानुभव यांच्या ऋणा-विषयीचा नसून हार्डीच्या कादंबरीतले वाता-वरण व 'वासनाकाण्ड'मधील वातावरण यातील नाते सूचित करणारा आहे. अशा नाटकाचे स्वरूप कोणत्याही अर्थाने प्रतिकृती-वादी वा कथानिवेदनपर असण्याची शक्यता नाही. त्यामुळे हे नाटक बहीणभावाच्या अनैतिक संबंधाविषयीचे आहे हेही विधान अप्रस्तुत आहे. कारण आजचे कोणतेही महत्त्वाचे नाटक कशाविषयीचे नसते. ते तो संपूर्ण अनुभव सादर करण्याचा यत्न करते. 'वासनाकाण्ड' या नाटकाचा अनुभव 'एखाद्या दुःस्वप्नासारखा आहे. नाटकाच्या आरंभी त्या प्रचंड वाड्याचा दरवाजा बंद करून आत येणारे दोघे – ललिता आणि हेमकांत हे जिथून माघारी फिरता येणार नाही अशा बिंदूपाशी आले आहेत. एकदा हा दरवाजा बंद झाला की त्यांचे Confro-tation सतत एकमेकाशी म्हणजेच स्वतःशी आहे. यासाठीच ते बहीणभाऊ असणे आवश्यक आहे.

आतापर्यंतच्या एलकुंचवारांच्या अनेक नाटकांत बंद दरवाजात स्वतःचा नरक निर्माण करणारी माणसे दिसतात. त्यातील अनुभवाचाच हा अधिक तीव्र आविष्कार आहे. या नाटकातील नायक हेमकांत शिल्प-कार आहे. प्रत्यक्ष अनुभव केवळ पार्थिव पातळीवर घेऊन–त्यापासून आपल्याला अलिप्त राहता येईल असे त्यास वाटते. याउलट जमिनीवर चालणारी लाली मात्र पार्थिव अनुभवांच्या वाहनातून खूप पलीकडे पोहोचू शकते. हेमकांत दगडांच्या प्रदेशात सौंदर्याचे–शिल्पारण्य निर्माण करू पहातो. किंबहुना या नाटकातील हेमकांत–ललिता हा संबंध आणि शिल्पकार–शिल्प हा संबंध या एकमेकांच्या प्रतिमा आहेत. शिल्पकाराचे अपयश, उध्वस्त शिल्पारण्य–मृत मूल जन्माला येणे. अंती त्या एकमेव लाकडी वाड्याचीच चिता पेटवून त्या दोघांनी स्वतःचा अंत करून घेणे यातून स्वतःच्या पापाला सामोरे जाणारे भयाण दुःस्वप्ना-सारखे लळित उभे राहते. एका अपरिहार्य नियतीच्या चक्रातील दोन जिवांची खूप दूर जाण्याची ही धडपड आहे. हा अनुभव मुळा-तच इतका अवघड आहे की प्रारंभी सुच-विल्याप्रमाणे त्याची मांडणी संपूर्ण नाट्यात्म विधानात करणे नाटककाराला जमलेले नाही. या नाटकाचे संवाद काव्यात्म आहेत पण नाटकातील काव्यात एनेकदा डोकावणाऱ्या कृतकतेपासून अलिप्त आहेत. हे नाटक शब्द-बंबाळ आहे अशी त्यावर टीका होत असते. (एलकुंचवारांचे मत असे की आजकाल आपण शब्दांना दचकायला लागलो आहोत.) ही टीका गृहीत धरूनही मला असे वाटते की, कोणत्याही अनुभवाच्या गाभ्यापर्यंत पोचण्याचा या नाटककाराचा आग्रही अट्टा-हास या सर्वांपेक्षा महत्त्वाचा आहे. मला स्वतःला खटकतो तो एलकुंचवारांचा हळवेपणा.

या प्रयोगाचे निर्मितीसंकल्पन अमोल पालेकर यांचे आहे. संपूर्ण रिकाम्या रंग-मंचावर फक्त एक प्रचंड दरवाजा आपल्याला दिसतो. या दरवाजाच्या पार्श्वभूमीवर हेमकांत (अमोल पालेकर) आणि ललिता (अनुया पालेकर) ही दोघं अगदी छोटी

दिसतात. प्रारभी त्याचा आवाजही खोल विहिरीतून आल्यासारखा वाटतो. कोणतीही वस्तू वापरून रगमचावर वास्तवाची प्रतिकृती निर्माण करण्याचा यत्नही दिग्दर्शकाने केलेला नाही किंबहुना आपण विशिष्ट नाट्यानुभव कोणत्या शैलीत सादर करीत आहोत याचे भान दिग्दर्शकाने सपूर्ण नाट्यप्रयोगात फार छान ठेवले आहे

सर्वसाधारणत: असे म्हटले जाते की, पालेकराना नाट्याच्या दृश्यस्वरुपाचे भान चागले असले तरी उच्चारित शब्दाकडे त्यांनी द्यावे तसे लक्ष पुरवलेले नाही. 'वासनाकाण्ड' नाटकामध्ये सवादाला, उच्चारित शब्दाला अत्यत महत्त्व आहे. आणि पालेकरद्वयाने हे सवाद त्यातील अर्थाचे वजन, वाक्यरचनेतील अतर्गत लय, काव्यभाषेचा स्वभाव लक्षात घेऊन सादर केले. (याला अपवाद नाटकाच्या अतीचा ललितेचा सवाद, ज्यामध्ये अनुया पालेकर यानी एक कंटाळवाणी लय स्वीकारली होती. त्याच्या वाक्योच्चारणात काही ठिकाणी चुकीच्या जागी वजन पडत होते )सवादाच्या अतरगातच आपल्या नाटकाचे दृश्यरूप शोधणे हे पालेकरी निर्मितीसकल्पनाचे वैशिष्ट्य आहे. (विशेषत: 'गोची' व 'चल रे भोपळ्या...') याही नाट्यप्रयोगात 'हेम मला स्वीकार'... हा सवाद शैलीदार हालचालीतून सादर करून—या सवादाचा प्रतिध्वनी घुमत असतो.

मागील शिल्पारण्यात प्रवेश नेऊन, दिग्दर्शकाने हेमकांत—ललिता आणि शिल्पकार—शिल्प या दोन नाट्यसूत्राचा अन्वय विशद केला आहे. रवींद्र नाट्यमदिरातील विस्तृत रगमचावर केवळ दोनच पात्राच्या हालचाली सयोजित करणे अवघड होते. परंतु पालेकरानी कृत्रिम अनुरंजनाचा मार्ग न स्वीकारता सपूर्ण रगमच वापरल्याचा आभास, वैराण प्रदेशात दोघेच हाही आभास परिणामकारिकतेने व्यक्त केला

अनुया पालेकरांना ललितेच्या भूमिकेत विविधवृत्तींचा आविष्कार करण्याची सधी प्राप्त झाली होती. आणि या सधीचा पुरेपुर उपयोग त्यानी करून घेतला. वाड्यात शिरताना भयाने थरथरणारी, अवघ्या शरिराचा सकोच करणारी ललिता,स्वत:तील स्त्रीत्त्वाचा साक्षात्कार झालेली ललिता, दुसऱ्याच्या व्यक्तिमत्त्वावर हुकमत गाजवणारी स्त्री, मातृत्त्वाच्या जाणिवेने स्त्रीत्त्वाच्या पारंपरिक सकेताशी नाते साधू पाहणारी ललिता अशी एकाच स्त्रीची विविध रूपे या अभिनेत्रीने सवेदनाक्षमतेने समरसतेने सादर केली. डोळे अति विस्फारून भूमिका करण्याची त्यांची लकबही त्यांनी टाकली होती. मात्र त्यांचा अभिनय काही ठिकाणी उग्रपणाऐवजी भडकपणाकडे झुकू पहात होता. नाटकाच्या उत्तरार्धात पश्चात्तापानतर प्रायश्चित्त म्हणून वेश्या झालेली ललिता प्रवेश करते. तेथपासून अनुया पालेकराची भूमिकेवरची पकड काहीशी सैल झाली होती. अर्थात या भागात ही नाट्यसहिताही कच्ची आहे. विशेषत' कळसूत्री बाहुलीसारखी आडवी मान फिरवण्याची अनुया पालेकराची लकब या भागात खटकली.

अमोल पालेकरांचा हेमकान्ताच्या भूमिकेतील चेहरा दाढीमुळे प्रौढ वाटणारा होता. शिवाय आधीच इतर चेहऱ्याच्यामानाने अप्रमाणित मोठे असलेले त्यांचे नाक हेमकान्ताची जिद्द-आग्रह व्यक्त करण्यास पूरक ठरले.

डोळ्यात आणलेली वेडसरपणाची झाकही मायेपासून अलिप्त राहूनही आयुष्य पूर्णार्थाने शोषू पाहणारा कलावत उभा करण्यास मदत करीत होती. अमोल पालेकरांच्या अभिनयाचा सयत सूर आणि अनुया पालेकराच्या अभिनयातील चढा सूर यांतील विरोधही अतिमत. हेमकान्त-ललिता या दोन प्रवृत्तीतील विरोध अधोरेखित करीत होता.

या नाटकातील पार्श्वसगीत व पार्श्वसकेत या दोन्हीचा वापर दु:स्वप्नाचे वातावरण निर्माण करण्यासाठी केला गेला. देवीच्या मिरवणुकीची कर्कश्य घुमणारी वाद्ये अथवा दुर्गाबाई भागवतांच्या कापऱ्या आवाजातील ओव्या दोन्ही सजावटीसाठी वापरलेल्या नसून अर्थवाहक होते. शैलीदार हालचालीतील प्रसगापुरता गुलाबी रग वापरून एरवी लोकपरंपरेला मातीला जवळ असणारे लाल-हिरवा-पिवळा हे रग आणि राठ पोत वापरण्यातील दिग्दर्शकाचे प्रयोजनही प्रेक्षकांपर्यंत पोचत होते. विठ्ठल शानभागांची शिल्पे आणि पाटलाचा दरवाजा हे उल्लेखनीय नेपथ्यविशेष होते.

'अनिकेत'ने सादर केलेला महेश एलकुचवाराच्या 'वासनाकाण्ड' या नाटकाचा प्रयोग मन अस्वस्थ करणारा होता. सपूर्ण ताणलेल्या मन:स्थितीतील या प्रयोगावर अश्लीलतेचा थिल्लर आरोप होणे हेही हास्यास्पद आहे. हा प्रयोग अमोल पालेकराच्या दिग्दर्शक आयुष्याच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा वाटेल. ☐

**ताजी बातमी :** 'अनिकेत' सस्थेने रंगभूमीप्रयोग परिनिरीक्षण मडळाच्या निर्णयाविरुद्ध सास्कृतिक सचालनालयाकडे केलेले अपील वेळेवर पोहोचले असून या अपिलाची सुनावणी १५ ऑक्टोबर ७४ रोजी आहे. (त्यामुळे अपील पोहोचलेच नसल्याची वार्ता केवळ अफवा असावी ) ☐

---


# पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

ब. मो. पुरंदरे | किमत सात रुपये | राजहंस प्रकाशन पुणे ३०


---

नजर
ह. शि. खरात



# अंकुर
## शबाना व साधू ह्या दोघांचा

गर्महवा नंतर त्याच तोलामोलाच चित्र अंकुरच्या रूपाने हिंदी चित्रपट सृष्टीत आल्याने आता हिंदी चित्रपट खरोखरच फार्मात येत आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही. हिंदी चित्रपट सृष्टीचं रूप पालटू लागल्याची जाणीव हल्ली प्रखरतेने होते ती अशा प्रकारचे चित्रपट जाणीवपूर्वक पडद्यावर आल्यामुळे. निसर्गाचं भान राखून मूलभूत मानवी सुखदुःखाचा आविष्कार अत्यंत वास्तव पातळीवर करण्याचा कलात्मक प्रयत्न हल्ली असल्या अनेक चित्रपटातून आढळतो. हिंदी चित्रपट मसाल्या पेक्षा सच्च्या मातीशी नातं जोडू पाहतोय ही गोष्ट कोणत्याही साक्षेपी रसिकास आनंद देणारी अशीच आहे. आणि म्हणून अंकुर हा हिंदी चित्रपट जरी संपूर्ण समाधान देत नसला तरी अलीकडील नव्या लाटेतील हिंदी चित्रपट सृष्टीला फुटलेला तो एक जिवंत धुमारा आहे हे निश्चित.

अंकुर हा चित्रपट अनेक दृष्टींनी लक्षणीय आहे. परंतु एकंदर चित्रपट म्हणून परिणामाच्या दृष्टीने तो पूर्ण समाधान देत नाही. ‘रेयान्स डॉटर’ ह्या इंग्रजी चित्रपटाएवढी डेप्थ अंकुरला नसली तरी त्याची आठवण व्हावी असं त्याचं चित्रण आहे. त्यातील अनुभव अस्वस्थ करणारा असून कुठे तरी आपल्याही अनुभव विश्वाची काच ह्या चित्रपट पाहून तडकल्याशिवाय रहात नाही. ह्या चित्रपटाचा शेवट हीच खरी ह्या चित्रपटाची सुरुवात आहे. इतका परिणामकारक आणि प्रतिकात्मक शेवट आतापर्यंतच्या कोणत्याच चित्रपटात आढळत नाही. असा अफलातून शेवट केल्याबद्दल किंवा असे आयडियाबाज डोके लढविल्याबद्दल शामबेनेगल ह्या दिग्दर्शकाला आपण मानले पाहिजे. केवळ ह्या चित्रपटातील शेवटामुळे हा चित्रपट कुठल्या कुठे पोहोचतो. काही चित्रपटांच्या जाहिरातीत ज्या प्रमाणे सुरुवात चुकवू नका असा आकर्षक इशारा असतो तसाच अंकुरचा शेवट चुकवू नका असा प्रेमळ सल्ला अवश्य द्यावासा वाटतो. खरं म्हणजे हा सल्ला देण्याची गरजही नाही. कारण अंकुर शेवटपर्यंत बघावासा वाटणारा चित्रपट आहे. काही ठिकाणी तो विलक्षण पकड घेतो, परंतु संपूर्ण परिणामाच्या दृष्टीने त्यातले काही शॉट्स आपली निराशा करतात. निदान परिणामाच्या दृष्टीने रसहानी तर निश्चित करतात. खरं म्हणजे कथा तशी ताकदीची आहे. परंतु काही गोष्टी नसत्या तर फार बरे झाले असते. दारू आणि जुगार प्रकरण तसेच एक बाई नवऱ्याकडे नांदायला जात नाही हे प्रकरण विनाकारण रसहानी करते. त्या प्रसंगातील काही संवाद तर अश्लील वाटतात. अर्थात अभिरुचीच्या दृष्टीने. चित्रपटाची सुरुवात व सुरुवातीचा काही भाग डाक्युमेंटरी टाईप वाटतो. अर्थात तो शामबेनेगलच्या सवयीचा परिणाम असावा. त्यातले काही निसर्गरम्य शॉट्स अतिशय देखणे असले तरी कुठल्या तरी डाक्युमेंटरीमधले वाटतात. कथेशी एकरूप होणारे असे ते शॉट्स नाहीत. आणि ते घेतलेही आहेत त्याच अँगलसने. लक्ष्मी व सूर्य हे शरिराने जवळ येईपर्यंतचा भाग जरा बाळबोधच वाटतो. तसेच लक्ष्मी ही झाडलोट करणारी बाई. परंतु तिचा चापूनचोपून केलेला मेकअप अनेक सुंदर क्लोज-अपसच्या वेळी आपली निराशा करतो. बरं अन्न खायला नाही म्हणून तांदुळाची चोरी करणारी ही बाई हँडलूमच्या शोभतील अशा तीन तीन साड्या मॅचिंग चोळी सकट वापरते. खरे म्हणजे ती जुनेरात हवी. आणि ती ही एकाच. परंतु ती नायिका असल्याने आकर्षक दिसली पहिजे ना ! तिची साडी नेसणंही गोल पातळ नेसणाऱ्या शहरी बायकांनी शिकावं असं. तसेच एका प्रसंगात ती झुरळ झटकावं तसे एका नागाला हुसकावून लावते, हे पटत नाही. स्त्री म्हणून जरा तरी मानवी भीती असतेच. तसेच विहिरीच्या पाण्यात केस धुणे, हा शॉट तर केवळ तिचे उरोज दाखविण्यासाठीच घेतला आहे. बाकी असा पदर टाकून कोणती कामाठीबाई केस धुते ? अशा काही गोष्टी अधून मधून खटकत असल्यातरी ,ह्या चित्रपटाची कथा अत्यंत समर्थ अशी आहे.

लक्ष्मी ही उफाड्याची बाई. कोणत्याही पुरुषाला मोह पाडील अशा अंगारूपाची ही आई वेगळी पोर. अर्थात खालच्या जातीची. पैसा अडका नसल्याने धास्तावलेली तिची आई एका मुक्या नि बहिऱ्या कुंभाराला देते. कारण ह्या दोघींचा सांभाळ ह्या बिचाऱ्या मुक्या किस्तियाने केलेला असतो. तसा किस्तिया दगडासारखा मर्द असतो. मातीची मडकी करायचा. पण पुढे मडकी कोणी वापरीना. धंदा बसतो आणि हाही कोलमडतो. शिंदी प्यायचं व्यसन लागतं. लक्ष्मीला किस्तीयाबद्दल खूप वाटते. त्याच्यावर तिचा जीव आहे. त्याच्याशी लग्न केल्याबद्दल तिला वाईट वाटत नाही. परंतु शिंदी प्यायचं व्यसन तिला व्याकुळ करतं. तिची एकच इच्छा असते. तिला आता बच्चा हवा असतो. ती ज्यांच्या शेतवाडी झाडलोट करायची, त्या मोठ्या सरकाराचा एक उनाड पोरगा शिक्षण थांबवून ह्या शेतात येतो. पोरगा अकलकम म्हणून त्याचा बाप त्याला शेतावर पाठवतो. सूर्य शेतावर येतो ते स्वतःची हुकमत गाजवायला. हे शेत आपलं आहे आणि आपल्या हुकुमाशिवाय इथे काहीच झालं नाही पाहिजे हा तारुण्यसुलभ बालिश

अहंकार त्याला छोटे सरकार करून टाकतो. गावातल्या बायकांना विहिरींवर पाणी भरणं बंद करतो. आपल्या बाऱ्या अगवस्त्राला तो शेताला पाणी देणार नाही म्हणून चवक सागतो. शिंदी चोरणाऱ्याना जरब बसवतो. हे सार एका गुर्मीत करीत असताना त्याची भिरभिरणारी नजर अधून मधून लक्ष्मीवर अडखळत होती. त्याला न कळत तो तिच्याकडे ओढला जात होता. लक्ष्मी त्याच सारं करीत असे. सकाळी चहा देणे. जेवणखाण. खर म्हणजे तसा तो बडखोर. पुजाऱ्याच्या हातच जेवण वंद करून तो तिच्या हातच खातो. एक दिवस किस्तिया शिंदी चोरताना पकडला जातो. त्याला जरब बसावी म्हणून चकोटी करून त्याची गाढवावरून धिंड काढतात. लक्ष्मीला हे फार लागत. किस्तिया तर गाव सोडून पळून जातो. त्यामुळे लक्ष्मी आणि सूर्य अधिकच जवळ येतात. लक्ष्मी आधी तयार नसते. परतु माझी बायको आली तरी तुझा सांभाळ करीन असे गोड बोलून तो तिला फशी पाडतो. एक दिवस तो तिला तिची कहाणी विचारतो. तुला मूल का झाल नाही म्हणून विचारतो. किस्तियाबद्दल शका घेतो. तेव्हा ती त्याला तडकावते आणि किस्तिया एक पत्थरासारखा मर्द आहे असे त्यास सुनावते. लक्ष्मी-सूर्य हे प्रकरण गावगन्ना होते. गावातील कुजबुज बापाच्या कानी जाते. बाप दम देऊन जातो. काय करायचे ते कर पण गावात वट्टा लागला नाही पाहिजे असे सुनावतो. आणि सूर्याच्या बायकोला शेतावर पाठवतो. सरू येते आणि तिला लक्ष्मीच असं रहाण आवडत नाही. स्वयपाक वगैरे गोष्टी करावयास लक्ष्मीला बंदी होते. परतु निसर्ग थोडाच थाबणार. लक्ष्मीला दिवस जातात. एक दिवस ओकाऱ्या काढताना सरूच्या ध्यानात काय ते येते. सूर्य तर घाबरून जातो. कारण गावात नाचक्की होणार. तो तिला पोर पाडायला सांगतो. ती तयार होत नाही. तिला गाव सोडून जायला सांगतो. ती जात नाही उलट म्हणते मूल मला होणार आहे तू कशाला घाबरतोस. ती शेतावर रहाते परंतु काम नसल्याने खाण्याचे वांधे कामासाठी पुन्हा ती सूर्याकडे जाते. सरू तिला जेवायला देऊ पहाते. परतु तादूळ चोरताना ती पकडली जाते. सूर्य तिला हाकलून देतो. तशीच उपाशीपोटी पण भरल्या ओटी झोपली असताना पहाटे जागे होऊन पहाते तो किश्तिया शेजारी झोपलेला. किश्तिया पैसे कमावून परत येतो. तो तिला जवळ घेऊ पहातो. परतु अपराधी जाणिवेने ती हमसाहमसी रडू लागते. किश्तियाच्या ध्यानी येते की लक्ष्मी गरोदर आहे. त्याला उलट आनद होतो. तो ओढीत तिला देवळात घेऊन जातो. देवान ऐकल म्हणून माथा टेकतो. आता मुलासाठी तो पुन्हा काम मिळविण्याच्या इराद्याने सूर्याकडे जातो. परतु सूर्याच्या डरपोक मनात आपले पाप उभे राहते. किस्तिया आपल्याला मारायलाच येतोय ह्या भावनेने तोच उलट त्याला मरेपर्यंत चावकाने फोडतो. लक्ष्मी धावत येऊन सूर्याची भर माणसात हजेरी घेते. त्याची निर्भर्त्सना करते. सूर्याला आपलीच कीव येऊन रडू येते. आणि त्याच्या बायकोला खरा प्रकार कळतो. लक्ष्मी किस्तियाला आधार देत घेऊन जाते. परतु ह्या प्रसगाने गावातल एक पोरग सतापत आणि रागान चिडून जाऊन एक भला मोठा धोडा सूर्याच्या घराच्या बद खिडकीवर भिरकावत. खिडकीची तावदान खळकन् फुटतात. हा धोडा सबध प्रस्थापित विश्वालाच तडा पाडून जातो. हा शेवट भलताच क्लासिक आहे. ह्याचवेळी सूर्याच्या बापाने ठेवलेल्या बाईचा मुलगा शेवटी एकटाच अगणात उभा राहिलेला दाखवणे हा शॉट अर्थपूर्ण आहे.

परंतु हा चित्रपट खऱ्या अर्थाने आहे शब्बाना आझमी व साधू मेहेर ह्या दोघाचा. त्याच्या कसदार व समर्थ अभिनयाने ह्या चित्रपटाला फार मोठ तर केलच आहे परतु अकुरच्या साऱ्या यशाच श्रेय ह्या दोघानाच आहे. शब्बाना आझमीच लक्ष्मीच काम झपाटून टाकणारे आहे. तिच चालण, बोलणं व चेहऱ्यावरील मुग्ध भाव, तशीच चीड अत्यत सहज व म्हणून जिवतपणे साकार होते. किस्तथा आल्यावर तिच हमसाहमशी रडण विवी अडरसनची आठवण करून देणार आहे. तिच गर्भारशी असतानाच ओकण तर खरोखरीचेच वाटत. तादूळ काडताना तिची उभे रहाण्याची आणि हात वर खाली करण्याची ढब बघून घ्यावी तिने अक्षरशः लक्ष्मी ही जिवतपणे साकार केली आहे. अभिनयाची चागली जाण व समर्थपणे तो साकार करण्याचे गुण तिच्यात प्रकर्षाने आढळतात. तिच्या खालोखाल लक्षात राहतो साधू मेहेर हा अत्यत गुणी नट आहे. आपण ह्याला अनेक डाक्युमेंटरीजमध्ये पाहिला आहे. व तेथेही तो जिवत वाटला आहे. किस्तियाच त्याच मुकं आणि बहिऱ्या माणसाचं काम अत्यत प्रभावी असून अस्वस्थ करणार आहे. इतके सयमीत काम साधूलाच जमऽ आहे. अनंत नाग व प्रिया तेंडुलकर त्याच्या भूमिकांच्या दृष्टीने ठीक आहेत. पंडीत सत्यदेव दुबे ह्याचे सवाद त्या त्या पात्राचे न वाटता सत्यदेव दुबेचे वाटतात. तसेच शब्बानाला हैदराबादी मुसलमानी बोली सारखे हेल काढून बोलायला लावणे खटकते. छाया चित्रण सुदर असून चित्रपट सरळ घेतला आहे सगीतात विशेष काही नाही. सबध चित्रपटात झपाटून टाकतात ते शब्बाना आझमी आणि साधू मेहेर. आणि अकुरच सगळघात मोठ यश हेच आहे. □


**शनवारवाड्यातील शमादान**

ब. मो. पुरंदरे

किमत साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन पुणे ३०

# साप्ताहिक भविष्य

कृष्ण माईणकर

१२-१०-७४ ते १८-१०-७४

## श्रीमती इंदिरा गांधींची धक्कादायक हालचाल

तूळ राशीत रवीसारख्या राजकारणी ग्रहाचे आगमन ही काही सत्ता आणि राजकारणात शांतता निर्माण करणारी गोष्ट खासच नव्हे. सध्याच पंतप्रधान अनेक क्षेत्रात या ना त्या कारणाने हस्तक्षेप करीत आहेत. अर्थ, कृषी, वगैरे महत्त्वाची खाती त्याच स्वतः हाताळीत आहेत. या आठवड्यात मंत्रिमंडळाच्या व खातेबदलाच्या रचनेबद्दल त्या जोरदार हालचाली करू लागतील. व्यापार, अन्नधान्य, काळा पैसा इत्यादी क्षेत्रात एखादा वटहुकूम निघून खळबळ माजेल. देशाला खळबळजनक ठरणारी व ज्या व्यक्ती जाचक ठरत आहेत त्याबद्दल कारवाई सुरू होईल. बिहारमध्ये एकदम धक्कादायक बदल संभवतो. महाराष्ट्रातही चाहूल लागेल.

**मेष** : मतभेद टाळा

माणसाच्या जीवनात चढउतार होतात, तसेच केव्हा अनुकूल तर केव्हा प्रतिकूल घटनाही घडत असतात. या आठवड्याच्या उत्तरार्धात शत्रूला नामोहरम करणारा रवी सातवा होत आहे. त्याची दखल तुम्हाला न घेऊन चालणार नाही. कारण तुमचा स्वभाव आधीच तापट. त्यातच हा सातवा रवी. कोणत्याच प्रकारचा कौटुंबिक मतभेद संसारात होऊ देऊ नका. पती अगर पत्नी यांनी एकमेकांना सांभाळून घ्यावे. टंचाई, महागाईने सारेच गांजले आहेत. तुम्ही तोल जाऊ देऊ नका. पैसा तसा कमी पडणार नाही. प्रतिष्ठेला धक्का लागणार नाही. नोकरीत मात्र अनेक घटना तुमच्या मनाला उत्साह देतील. महिलांनी तापट स्वभावाला आवर घालावा. जुळवून घ्यावे.

**वृषभ** : उद्योगात उत्कर्ष

पाचव्या मंगळाचे वरदान तुम्हाला लाभले असतानाच आता या आठवड्यात रवी शत्रुस्थानी पदार्पण करीत आहे. रवी–मंगळाचे एवढे मोठे सहकार्य तुम्हाला लाभले असताना आता चिंता कशाची करता? नोकरी असो की कोणत्याही प्रकारचा धंदा व्यवसाय असो त्यात नव्या योजनांची कार्यवाही करायला हा काळ उत्तम आहे. रविवार, सोमवार, गुरुवार व शुक्रवार या दिवशी तुमच्या इच्छा–आकांक्षांना अनुकूल साथ मिळेल. धंद्यासाठी भांडवल मिळेल. व्यापार-उदीम तेजीत चालेल. तुम्ही स्मगलिंग मात्र करू नका. तब्येतही सांभाळा. महिलांना नव्या वस्तूची भेट मिळेल. आशा-आकांक्षा पुऱ्या होत असल्याचा अनुभव येईल.

**मिथून** : अनपेक्षित यश

या आठवड्यातील पहिले तीन चार दिवस तुम्हाला विशेष अनुकूल आहेत. हर्शल-शनीचा शुभयोगदेखील अनेक अकल्पित घटना तुमच्या जीवनात घडवून आणील. या वेळी अनेक दिवस उराशी बाळगलेल्या आकांक्षा सफल होतील. उद्योग-व्यापारातील रेंगाळलेली कामे व नव्या योजना कार्यान्वित होतील. त्यांच्या प्रगतीला वेग येऊ लागेल. थोरामोठ्यांचे सहकार्य व आशीर्वाद मिळेल. पैशाचा तसा तुटवडा भासत नसला तरी पैसा हाती टिकणे कठीण आहे. नोकरीत बढती-बदलीच्या मागणीला चालना मिळेल. बेकारांना नोकरी अगर धंद्यासाठी संधी मिळेल. अपूर्व असे यश यावेळी तुम्हाला मिळेल. सर्दी-उष्णतेपासून मात्र तब्येतीला जपा. महिलांना वाङमय व कलाक्षेत्रात कीर्ती-प्रसिद्धीचा योग आहे.

**कर्क** : भावनावश होऊ नका

या आठवड्यात चौथ्या रवीच्या कारवाया तुम्हाला सहन कराव्या लागणार आहेत. बुधवारनंतर मन उद्विग्न होऊ लागेल, घरी व बाहेर मनाविरूद्ध घटना घडतील. मुले मनाविरूद्ध वागतील. तुम्हाला त्यांचे सुख लाभणे कठीण. मात्र ही प्रतिकूलता सोडली तर हा आठवडा तसा प्रतिकूल नाही. तुम्ही उगीचच आपल्या स्वतःच्या मनाला त्रास करून घ्याल. उगीचच काळजी वाटत राहील. नोकरीत तुम्हाला आपले कर्तृत्व दाखविण्याची संधी मिळेल. वरिष्ठांचे मन आकर्षून घेण्याचा योग येईल. परदेश प्रवासाची दीर्घकाळची इच्छा यावेळी सफल होईल. मित्रांचे सहकार्य मिळेल. शनीसारखा ग्रह तुम्हाला बारावा असल्यामुळे स्मगलिंगच्या वस्तू वापरणे कटाक्षाने टाळा. महिलांनो कर्ज काढून दागिने करू नका.

**सिंह** : नातेवाईकांची मदत

तुमच्या राशीचा अधिपती आहे रवी. या रवीच्या अनुकूल-प्रतिकूल भ्रमणावर तुमच्या परिस्थितीत अनुकूल वा प्रतिकूल परिणाम होतो. या आठवड्यात रवी तूळ राशीत तिसरा होत आहे. कर्तृत्वाला विशाल क्षेत्र उपलब्ध होणे, उद्योगाच्या नव्या दालनात प्रवेश होणे, दुर्मिळ अशा वस्तूंच्या उत्पादनाला सरकारी मान्यता मिळणे, नव्या योजनांना अनुकूलता लाभणे अशा प्रकारची कामगिरी तिसऱ्या रवीच्या कारकीर्दीत होत असते. त्यामुळे तुम्हाला गगनाला गवसणी घालावी असे वाटल्यास आश्चर्य नाही. त्याचप्रमाणे दुरावलेले नातेवाईक, मित्र या आठवड्यात पुन्हा तुमच्या सहवासात येतील. नोकरीत फारसा त्रास उरणार नाही. आर्थिक स्थिती थोडी सुधारेल. महिलांना ईश्वरी उपासनेचा साक्षात्कार होईल. व्रतवैकल्ये पार पडतील.

**कन्या** : अनुकूल बदल

तुमच्या राशीत रवी-मंगळ एकत्र होते. त्यामुळे नाही म्हटले तरी तुमच्या मनाचा कोंडमाराच होत होता. जे लोक तुमच्या पासंगालाही पुरणार नाहीत तेच तुम्हाला टिवल्याबावल्या दाखवीत होते. तुमच्या डोळ्याला डोळा देण्याची ज्यांना हिम्मत नव्हती तेच तुमच्यासमोर नाक वर करण्याचा भ्याडपणा दाखवीत होते. पण आता रवी बदलला असून मंगळ मात्र तुमच्या पाठीशी उभा आहे. मंगळाचे खरे सामर्थ्य आताच प्रकट होणार आहे व त्याचा तुम्हाला

लाभ होणार आहे. आताच कौशल्याने या विरोधकाविरुद्ध पावले टाका आणि विरोधकांना नामोहरम करा. या वेळी मुळीच माघार घेऊ नका. यश आणि सफलता तुम्हाला माळ घालणार आहे. नोकरी धंद्याची एकंदर परिस्थिती सुधारणेची राहील. पैसा गरजेपुरता हाती येईल. महिलांनी आत्मकेंद्रित वृत्ती सोडून कौशल्याने कोणतेही काम करावे.

**तूळ : आता थोडे थांबा**

मंगळाची उग्रता अजून काही काळ तुम्हाला त्रास देणार आहे. हा बारावा मंगळ जीवनात उलथापालथ करीत असतो. फार मोठ्या समस्या निर्माण करीत असतो. तशा त्या तुमच्यापुढे झाल्याही असतील. पण मंगळाची संगत सोडून रवी आता तुमच्या राशीत आला आहे त्याचा थोडाफार लाभ तुम्हाला होईलच. राजकारणातील तुमच्या आशा आकांक्षा आड येणारे विरोधक दूर सारले जाऊन तुमची एखादी महत्त्वाकांक्षा पुरी होईल. तुम्ही सत्ताधारी पक्षांत असाल तर एखादे महत्त्वाचे पद तुमच्या गळ्यात पडेल. तुमचा गौरवास्पद असा सन्मान होईल. पैसा आणि प्रतिष्ठा वाढेल. नोकरी-व्यवसायात अनुकूल असे स्थित्यंतर घडेल. महिलांना हा आठवडा छान आहे. उद्योग व नोकरीत प्रगती.

**वृश्चिक : नव्या क्षेत्रात पदार्पण**

हा आठवडा तुम्हाला प्रगतीचा आणि नव्या पर्वाची नांदी ठरणारा आहे. पहिल्या तीन दिवसात चंद्रबळ आहे. त्यामुळे नव्या उद्योगाची सुरवात करायला हरकत नाही. चालू नोकरीत त्रास नाही. पण त्यात बदल करावयाचा असल्यास मंगळवारी करावयास हवा. तुम्हाला शुभवार मंगळवार आहे. चालू आठवड्यात अकल्पित धनलाभाचा योग आहे. रेस–लॉटरीच्या मार्गाचा अवलंब करायला हरकत नाही. जमिनीचा व्यवहार रेंगाळत असला तर पुरा होईल. राजकारणी लोकांना नवी संधी मिळेल. महिलांनी लॉटरीचे तिकिट काढावे. यश आहे.

**धनू : नोकरीच्या दृष्टीने ठीक**

आजाराचा, शारिरिक दुर्बलतेचा परिणाम तुमच्या नोकरीच्या दृष्टीने प्रतिकूल झाला होता. पण त्यात आता बदल होऊ लागेल. तुमच्या कामाचे वा तुमचे महत्त्व वरिष्ठांच्या लक्षात येईल. तुमची बदली तुम्हाला हवी त्या ठिकाणी होण्याची चिन्हे दिसू लागतील. राहूच्या खर्चिक त्रासांचा परिणाम थोडाफार आर्थिक परिस्थितीवर जाणवेल. पण त्यामुळे उणीव भासणार नाही. तुम्हाला गुरुवार अनुकूल असतो. लेखनाची वा व्रताची सुरुवात या दिवशी करा. यश आहे. महिलांस एखाद्या मंगल कार्यात हौसेने मिरवण्याची संधी मिळेल.


**शुक्रवार दि. ११ ऑक्टोबर पासून**

सेन्सॉरने २ वर्षे बंदी घातली. मुंबईच्या प्रेक्षकांनी २ खेळातच पसंतीची ग्वाही दिली.
मुंबईच्या वर्तमानपत्रांनी एकमुखाने गौरविलेले चित्र

**( फक्त प्रौढांसाठी )**

सिने गिल्डकृत ( इस्टमन कलर )




लेखक – दिग्दर्शक ● संगीत
**महेश भट्ट** **भुपेंद्र सोनी**

भूमिका : कबीर बेदी, प्रेमा नारायण
गुलशन अरोरा

**नटराज (एअरकन्डिशन्ड) पुणे**

अगाऊ तिकिटविक्री सुरु आहे
सकाळी १० ते १२
संध्याकाळी ५ ते ७

**( युनिक फिल्म डिस्ट्रिब्युटर्स प्रकाशन )**


**मकर : संसारातील त्रास संपेल**

गेल्या काही दिवसात मुले व पती-पत्नी यांच्यात काही ना काही कुरबूर चालू आहे. तुमचे डोके तुम्हाला ठिकाणावर ठेवणे कठीण होत होते. पण आता ते दिवस विसरून जा. या आठवड्यात तुम्हाला हवा तसा बदल जाणवेल. मन शांत राहील. नैराश्य व दोलायमान स्थिती संपेल. तुम्हाला शनिवार व मंगळवार अनुकूल असतो. या दिवशी तुम्हाला काही चांगल्या घटनांचा प्रत्यय येईल. वरिष्ठांशी प्रमोशनबद्दल बोलणी करावयाची असतील तर या दिवशी करा. नोकरीत बदली-बढतीचा योग आहे. इंजिनियरिंग उद्योग सुरू करावयाला हरकत नाही. महिलांनी लहान प्रमाणात प्लॅस्टिक उपकरणे विक्रीचा उपयोग करावा.

**कुंभ : राजकीय सन्मान**

याच आठवड्यात रवी बदलत आहे. भाग्यस्थानी येणारा हा रवी तुम्हाला जर राजकारणात काही डावपेच खेळावयाचे असल्यास अनुकूल आहे. सत्तास्थानात एखादे महत्त्वपूर्ण पद तुमच्या गळ्यात पडेल. यावेळी तुम्हाला एकदम लोकप्रियता मिळण्याचा योग आहे. वकील, इंजिनियरिंग व डॉक्टर यांना वरिष्ठ जागेत सरकारी नियुक्ती मिळेल. नोकरीत हा आठवडा बदल घडवून आणील. मात्र पैसा मिळेल. तुम्हाला शनिवार व बुधवार अनुकूल असतो. धंद्याच्या दृष्टीने जर बदल करावयाचा असेल, योजना आखावयाची असेल तर हे दिवस लक्षात असू द्या. महिलांना योग्य अशी नोकरी मिळेल.

**मीन : पैसा मिळेल**

मानसिक त्रास व मधून मधून येणारी उदासीनता या आठवड्यात संपेल. मन व शरीर प्रसन्न राहील. शारिरीक व्यथा दूर होईल. नोकरीतील अस्थिरता अनिश्चितता आता विरून जाऊ लागेल. शुक्रवार हा तुमचा शुभ दिवस आहे. या दिवशी मनोभावे कुलदेवतेची प्रार्थना करा. उद्योगधंद्याचे बस्तान सावरणार आहे. न सुटलेला जागेचा तंटा यावेळी सुटेल. बंगला अगर फ्लॅट घेण्याची इच्छा सफल होईल. उद्योगासाठी कर्ज व कुणाला भेटावयाचे असेल तर याच आठवड्यात ते काम करा. महिलांनी उगाच मनस्ताप करून घेऊ नये. हा आठवडा त्यांना उन्नतीचा आहे. □

# चकनाचूर

भाऊ पाध्ये

## शत्रूला आपल्या जातभाईंची एवढी कदर कुठून आली ?

'मी, शत्रुघ्न सिन्हा भारतीय प्रजासत्ताकाचा नागरिक, निवेदन करतो ऐसाजे–'

'इलस्ट्रेटेड वीकली नावाचे एक निर्मळ अंग्रेजी अखबारपत्र घेऊन, शत्रुघ्न उर्फ शॉट्गन सिन्हा उर्फ मि. बकवास यांनी पिवळ्या अखबारवाल्यांच्या कारनाम्यावर हल्ला चढवला आहे; तो अनेकांनी वाचला असेल. 'मी शत्रूघन सिन्हा, भारतीय प्रजासत्ताकाचा–' ही त्यांच्या हल्ल्याच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत वाचताना गंमत येते. एके काळी 'प्राणला जी कमाई करण्यास वीस वर्षे लागली ती आपण दोन दिवसामध्ये केली' असे येता–जाता बुजुर्गांची अखबारवाल्यांजवळ उडवून आपल्या पॉप्युल्यारिटीमध्ये मस्त रहाणारा हा शत्रुघन सिन्हा, आता त्या 'वीकली' मध्ये म्हणतोय, 'हे पिवळे अखबारवाले काय काय लिहीत असतात आम्हा सिनेमा नटाविषयी. डिंपलविषयी किती घाणेरडं लिहितात, मुमताझला त्यांनी जगणं अशक्य करून टाकलंय वगैरे. म्हणजे बुजुर्ग नटांना कुचकामी मानायचं, आपले अमिताभसारखे जे यार आहेत, त्यांना घमेंड दाखवायची, 'अरे, पॉप्युलर कसे बनायचे, हे आपल्याकडून शीक !' कधी सेटवर हेमाच्या गळ्यात गळा घालून बसायचं वगैरे शत्रुस्टाईलचे कारनामे आता बंद होणार का ? शत्रुचं परवाचं आर्टिकल वाचलं. 'वीकली'तले नी तो राजेश खन्ना, संजीव कुमार, डिंपल, मुमताझ यांची बाजू घेऊन पिवळ्या अखबारवाल्याविरुद्ध लेखणीने समशेरींचे हात करू लागला तेव्हा आपण चक्क आईस्क्रीम झालो. तसा अखबारवाल्यावर कोणीही रागावला आणि फिल्म इंडस्ट्रीची कड घेऊन कोणीही बोलू लागला, तर कुणालाही धक्का बसणार नाही. पण ज्यावेळी शत्रु त्यांच्याशी युद्ध करायला निघतो आणि तोही फिल्मवाल्यांचा कड घेऊन, त्यावेळी कुणालाही त्याची मजा वाटेल. आमच्यापेक्षा अनेक सिनेमावाल्यांना त्यांची गंमत वाटेल. राजेश खन्नाविषयी पिवळे अखबारवाले काही बाही लिहितात यामुळे शत्रु चिडलाय हे वाचून राजेशला गंमत वाटेल. संजीवला लोक स्टंट-हिरो म्हणाले, त्याला अदाकार म्हणण्यास कोणीही तयार झाले नाही म्हणून शत्रु चिडलाय हे पाहून संजीव आपल्या स्टाईलमध्ये गालातल्या गालात हसेल. हेमाच्या लग्नाविषयी वाट्टेल ती गप्प उठवतात म्हणून शत्रु चिडलाय हे पाहून जितेंद्रशी तिच्या लग्नाच्या वावटळीने केलेल्या करमणुकीनंतर पुन्हा करमणूक होईल. 'आता अमिताभची दारं पत्रकार ठोठावताहेत' म्हणून शत्रु अभिमान बाळगतो हे ऐकून अमिताभला आपण खरोखरच पॉप्युलर झाल्यासारखं वाटेल अर्थात कुणाला काय वाटेल ते काय सांगावं ? कदाचित पिवळ्या अखबारवाल्यांनी फिल्मी अदाकारांना इतका वैताग दिला आहे की सारे अदाकार शत्रुच्या पाठीशी उभेही रहातील. पण, एखाद्या सीनमध्ये एखाद्या अॅक्टरवर खटला चाललेला आपण पहातो. अॅक्टर आता फाशीच्या फंदातून सुटत नाही असा दारूण प्रसंग चाललेला असतो. इतक्यात एखादा भलताच अॅक्टर वकील बनून त्या अदाकाराची वकिली करू लागतो. त्यावेळी आपण जसे खुर्चीमधून उडतो, त्याचप्रमाणे सगळ्या सिनेमावाल्यांच्या बाजूने शत्रू वकिली करण्यास उभा राह्यलाय हा प्रसंग पाहून आपणही उडालो. राजेश खन्ना उभा राह्यला तर ते समर्थनीय आहे. मागे सत्यदेव दुबेने 'फिल्म फेअर'मध्ये त्याची इंटलेक्चुअल मुलाखत घेतली होती, त्यावेळी ह्या हिरोने प्रत्येक सवालाला असा जवाब दिला की आपण राजेशला मानले. कबीर बेदींसारख्या



शत्रु पूनमला (कालची कोमल) 'या पिवळ्या अखबारवाल्यांना मी अशी सबक शिकवतो की' – असे सांगतोयसे दिसते !

इंटलेक्चुअलने 'जी अदाकारी लोकापर्यंत पोहोचत नाही, ती अदाकारी बकवास आहे,' असे म्हणून एक प्रकारे फिल्म इंटस्ट्रीची तळी उचलली तर ते बरे वाटते. शर्मिला टागोर सारख्या अक्कल असलेल्या अदाकाराने फिल्म इंडस्ट्रीची वकिली केली तर तिचे म्हणणेही सिरिअसली विचारात घ्यावे लागते पण, शत्रू वकिली करू लागतो तेव्हा ?

शत्रू हा फिल्म इंडस्ट्रीमध्ये ज्याची त्याची छुट्टी करून टाकण्यासाठी आलेला माणूस. तो प्राणची अदाकारीत छुट्टी करून टाकील, राजेश खन्नाची पॉप्युलॅरिटीमध्ये छुट्टी करून टाकील, आणि संजीवकुमारची पोरींच्या लफड्यामध्ये छुट्टी करून टाकील. थोडक्यात पिवळ्या अखबारवाल्यांचा आणि शत्रुचा मकसद एकच होता—छुट्टी करणे. हिंदी सिनेमा हा अदाकारांनी पडद्यावर उभ्या केलेल्या त्याच्या 'इमेज'वर उभा आहे. शत्रुही आपल्या लेखात हीच गोष्ट सांगतो. पण, याच अदाकारांच्या इमेजची छुट्टी झाली तर हिंदी सिनेमाचे काय होणार ? प्राण हा जर चांगला अदाकार नाही असे आपण क्षणभर मानले तर प्राणमुळे चाललेली 'धर्मा' 'कसौटी' व्हिक्टोरिया २०३, अशी अनेक पिक्चर्स धडाधडा कोसळतील. राजेश खन्ना टॉपचा हिरो राहला नाही आणि त्यामुळे त्याची लागोपाठ नऊ पिक्चर्स फ्लॉप झाली, तेव्हा अदाकारांच्या इमेजची छुट्टी झाली तर काय होईल ? पिवळ्या अखबारवाल्यांचे काय होईल याचा त्यांचा त्यांनी विचार करावयाचा आहे. तुम्ही स्टार-डस्ट सारखे पिवळ्या अखबारच्या 'मीनाज लेटर'मध्ये ज्या त्या अदाकाराची छुट्टी केलेली वाचता. पण आणखी काही पाने उलटल्यावर त्यांचा 'एव्हरीथिंग यू ऑल्वेज वॉटेड टू नो' असे एक सवाल जबाबांचे पान येते आणि ते वाचलेत की तुमच्या लक्षात येते की या पानातले सगळे संपादकीय जबाब अदाकारांना चांगले म्हणणारे आहेत. म्हणजे एका पानावर छुट्टी आणि दुसऱ्या पानावर चमचेगिरी असा या स्टार-डस्टवाल्यांचा खाक्या दिसतो. म्हणजे त्यांना कुणाही अदाकाराविषयी काहीच म्हणायचे नाही. लोकांनी आपला अखबार खरीदावा, आणि भंकस म्हणून वाचावा आणि आपण कमाई करावी एवढाच त्यांचा मकसद आहे. अर्थात पैसे कमावणे हा कुणाचा धंदा असल्यास आपण

काहीच म्हणत नाही. उद्या रस्त्यावरची पोरे मटका खेळताना मेंढी, एक्का, चोका, असे आकडे न लावता हेमा, शत्रू, राजेश, धर्म असे आकडे लावू लागले, तर तुम्ही त्याना अडवू शकणार नाही. त्याप्रमाणे स्टार-डस्टवाल्यांनी कुणाला काही म्हटले तरी त्याचे मनावर कशाला घ्यायचे कुणी ? *पिवळ्या अखबारवाल्यानी मुमताझला* काहीही म्हटले म्हणून तिने आपली जिंदगी का बरबाद करावी ? तिने त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे. खरे म्हटले तर मुमताझने आपली फिल्मी जिंदगी वाटेल ते रोल्स करूनच खराब केली होती. नारीयलवाली, खिलौनेवाली, बनून ती बाजारात बसू लागली तेव्हाच लोक तिच्या अदाकारीला वैतागले. परतु ' चोर मचाए शोर 'मध्ये पुन्हा ती वेगळ्या भूमिकेत पेश झाली आणि लोकांना ती आवडलीच की नाही.


पिवळे अखबारवाले तुम्हाला जीना हराम हुवा असे करून टाकतात, ते कसे काय ते तुमचे तुम्हाला ठाऊक ? पोरीची लफडी फक्त सिनेमावालेच करतात आणि दुसरे कोणीही करत नाहीत असे नाही. आम्हीही करतोच. आणि आमच्या जगात काही पिळघा नजरेचे लोक आमचीही छुट्टी करून *टाकण्याची आयडीया करतात. पण आम्ही* त्याना पुरून उरतोच की नाही. तर पिवळे पत्रकार म्हणजे खरोखर हिंदी पिक्चरमधल्या डायलॉगप्रमाणे ' किस खेतकी मूली ' आहेत. ते काय कुणाची छुट्टी करतात ? अशी छुट्टी करता आली असती, तर सिनेमा धद्यातले पाव किलो अदाकार आणि अदाकारा तरी शिल्लक उरल्या असत्या का ? अदाकाराची छुट्टी फक्त अदाकारच करतो आणि ती अदाकारीमध्येच. ' मदहोश मध्येमहेद्र साधूची अदाकारीमध्ये राकेश रोशनने छुट्टी केली त्यामुळे त्याला आणखी रोल्स मिळू लागले आणि महेद्र साधू मागे पडला. हे उदाहरण पहा की.

पण अदाकाराची छुट्टी करण्याची शत्रूची आयडीया वेगळीच होती. हिंदी सिनेमातला बुजुर्ग व्हिलन प्राण आता जुना होऊ लागला होता आणि लोकांना त्याची जागा घेण्यासाठी नवा चेहेरा हवा होता. शत्रू ती जागा घेईल असा लोकांना दिलासा वाटत होता, म्हणून लोकानी शत्रूला उचलून धरले होते एवढेच. पण, शत्रूला त्यामुळे आपण सगळ्या अदाकाराची छुट्टी केल्याचा गर्व झाला. तो अधिक थिएट्रिकल आदाकारी मग करू लागला ' तन्हाई 'मध्ये तो नुसता ' एट्री ' करून टाळी घेण्याचा प्रयत्न करतो. त्याच वेळी त्याची आदाकारी किती बडल आहे, हे पाहून आपल्याला हसू येते. दिग्दर्शक मनमोहन देसाईंची पिक्चर्स सोडली, तर शत्रुने एखादी पिक्चरमध्ये सिरिअसली अदाकारी केली आहे असं वाटत नाही. अदाकारी तर बोंबली. मग उरले काय ? पोरीची लफडी आणि दुसऱ्या अदाकाराना फालतू म्हणणे. रेखा, योगिता, पूनम (उर्फ कोमल) पासून हेमा–झीनत पर्यंत प्रत्येक पोरीबरोबर त्याचे नाव गोवले आहे. ही काही यलो अखबारवाल्यांची कर्तुत नव्हे, शत्रुची आणि त्याच्याच चमच्याची आहे त्याचे कोमलशी लग्न होणार ही गोष्ट त्याच्या अगदी जवळच्या चमच्याने एकदा माझ्यापर्यंत पोहोचवली होती. शत्रुसाहेब, आपण काही पिवळे अखबारवाले नाहीत आणि ती बातमी पचवून कुठेही कसलाही विधी (!) केला नाही. पण, बातमी थेट तुमच्या घराकडून आपल्याकडे आली. आता तुम्ही ' वीकली ' मध्ये कबूल करताच आहात की पिवळी अखरबारवाल्याची घाण पसरवण्यास तुम्ही सिनेमावालेही जबाबदार आहात तर ठीक आहे. कबूल केलीच पाहिजे तुम्ही आपली जबाबदारी ! ' याखेरीज सजीव हेमाप्रकरणी शत्रूकडून एवढा दुखावला गेला की आता त्या दोघाची पुराणी मैत्री खतम झाली आहे. झीनत तर शत्रुचे नाव घेताच अंगावर काटा उभा राहिल्यासारखा चेहेरा करते, वगैरे वगैरे शत्रुनेही काही कमी घाण *केली नाही. आपल्या हातानेच आपली छुट्टी* करून घेण्यात शत्रूसारखे दुसरे उदाहरण नाही.

बुजुर्गांना कमी लेखण्याची शत्रुची आयडीया अशीच त्याच्या अंगाशी आली. ' प्राणने जी वीस वर्षांत कमाई केली नाही, ती मी दोन वर्षांत केली ' अशा जोशामध्ये शत्रुने ' स्वर्गवासी पृथ्वीराज हा नट बडल होता ' असे म्हटल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले. आता तो आपण असे बोललोच नाही असे म्हणतो. असे बोलल्याबद्दल शम्मी कपूरने आपल्याला ठोक दिल्याची घाण पिवळ्या अखबारवाल्यांनी पसरवली असे विकलीमध्ये म्हणतो. अर्थात पिवळ्या अखबारमध्ये ही बातमी आली नव्हती. ' वीकली 'च्याच एका रिस्पेक्टेबल बघुपत्रात आली होती. आणि शत्रुने आता आपण स्वर्गवासी पृथ्वीराजविषयी असे उद्‌गार काढल्याचे नाकारले, तरी, ' *त्याने म्हणणे काही अशक्य* नाही ' इतके शत्रुचे इमेज जबरदस्त आहे. शत्रुचा इन्कार अखेर काहीच पटवत नाही. उलट तो रेडिओवर नव्या अदाकारांना जेव्हा ' बुजुर्गांना मान द्या ' म्हणून आवर्जून उपदेश करतो. त्यावेळी ' दालमें कुछ काला ' असल्याचा वास येतोच. आणि सर्वावर कडी म्हणजे पर्वाचे इलस्ट्रेटेड वीकलीमध्ये सर्व अदाकारांची त्याने केलेली वकिली.

शत्रु हा पुण्याच्या फिल्म इन्स्टिटयूटचा प्रॉडक्ट. ज्या फिल्म इन्स्टिटयूटच्या विद्यार्थ्यांना केंद्रीय मत्री रात्रंदिवस ' हिंदी सिनेमा वाईट असतात ' म्हणून सागत असतात. या फिल्म इन्स्टिटयूटने ' अँग्री मॅन ' नावाचा शत्रुवर एक छोटा चित्रपट काढला होता. ज्यावेळी फिल्म इन्स्टिटयूट मधून शत्रुने हिंदी चित्रपटसृष्टीत पाऊल टाकले, त्यावेळी असे वाटले की, हा अभिनयाचे नवे शिक्षण घेऊन आलेला अदाकार बलाढ्य सॅमसनच्या ताकदीने हिंदी चित्रपडसृष्टीची दुनिया हादरवून टाकणार आहे. पण, आता तो याच दुनियेचा रखवालदार बनून त्यावर गलिच्छ डाग पाडणाऱ्या पिवळ्या अखबारवाल्या उनाड पोर-पोरींना आपल्या लेखणीचा दडुका दाखवू लागलाय. भलतेच विनोदी दृश्य वाटते आपल्याला हे हिंदी सिनेमात आपण हिरो आहोत असे तो आपल्याला लेखामध्ये म्हणतो. खर म्हणजे त्याची पडद्यावरची हिरोगिरी केव्हाच बोंबलली आहे. आणि पिवळ्या अखबारवाल्यांना दमदाटी देऊन हिरोगिरी करण्याचा प्रयत्नही *तसाच पालथा पडलाय. खरं सागू, शत्रुला* आपला खरा अभिनय गुण अद्याप ठाऊक नाही. तो उत्कृष्ट विनोदी भूमिका करू शकेल. ' शादीके बाद 'मध्ये त्याने एक मस्त लहानशी पण विनोदी भूमिका केली होती, जी अद्याप विसरलो नाही. पडद्यावर आणि पडद्यामागे केव्हाही आपण त्याला विनोदी नट म्हणून मानण्यास तयार आहोत. ☐ ☐

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**



हिरवगार केळीचं पान
त्यावर पिवळं धम्मक श्रीखंड,
गडद केशरी जिलबी,
मधे पांढराशुभ्र भात,
त्यावर पिवळंदाट वरण,
डावीकडं फिकी हिरवी चटणी,
उजवीकडं गडद तपकिरी
वांग्याची भाजी...,
रंगच रंग






**नेरोलॅक**

**रंग-आपल्या जीवनातील एक अविभाज्य अंग**